# निळ्या क्षितिजाची हाक

डॉ. भारत करडक

साहित्य प्रतिष्ठान ®

# निळ्या क्षितिजाची हाक

डॉ. भारत करडक

ई साहित्य प्रतिष्ठान

# निळ्या क्षितिजाची हाक (Nilya kshitijachi haak)

लेखक : भारत करडक

Dr. Bharat G Kardak
M. Sc.(Organic Chemistry),
Ph. D.(Spain), PDF (Australia)
Principal
Pravara Medical Trust's
Arts, Commerce and Science College, Shevgaon, Dist-A'Nagar,
Maharashtra
412 502
Tel: (02429) 223031, 221966
Fax : (02429) 223399
Mobile +91 9503 636 999
bharat78@gmail.com
Website: www.kardakwadi.org

मुखपृष्ठ : सचिन काकडे

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे इ. पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी इ. साहित्य प्रतिष्ठान यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशांचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**ई साहित्य प्रतिष्ठान ही कवी, लेखक व वाचकांनी मिळून चालवलेली चळवळ आहे. नवीन उदयोन्मुख लेखकांसाठी हे व्यासपीठ आहे, आणि खेडोपाडी व देशोदेशी पसरलेल्या मराठी वाचकांसाठी वाचनाचे साधन आहे. इ. पुस्तके. आता स्मार्टफ़ोनवर डाऊनलोड करून किंवा ॲपद्वारे वाचता येतात. आपण या चळवळीचे भाग होऊ शकता. आपल्या ओळखीच्या लोकांचे इ. मेल पत्ते पाठवा. त्यांनाही विनामूल्य इ. पुस्तके पाठवू. नवीन वाचक आणि नवीन लेखकांचे या चळवळीत स्वागत आहे**

ज्यांचे मार्गदर्शन आणि पाठिंबा यांच्यामुळे

माझे आयुष्य बदलले ते

डॉ. गौड, श्री. म्हस्के व श्री सुर्वे यांचे चरणी

हे पुस्तक कृतज्ञतापूर्वक अर्पण!

अनुक्रम

करडकवाडी ते सिडनी

एकटा जीव सदाशिव

व्हिएन्ना

गांव हरवलेला माणुस

सुरू करायचंय एक गुऱ्हाळ!

परदेशातील शिक्षणाच्या संधी

दुनियादारी: गेला मित्र कुणीकडे

Spain Diary

# करडकवाडी ते सिडनी...!

(हा लेख 'दैनिक सकाळ'च्या दि. २२ जुलै २०१०च्या महाराष्ट्रातील सर्व आवृत्त्यांमध्ये संपादकीय पानावर प्रसिद्ध झाला होता. तसेच दै. सकाळच्या इंटरनेट आवृत्तीवर पैलतीर-आकाशभरारी' या सदरामध्ये उपलब्ध आहे. )

माझे नाव भारत गंगाधर करडक. मु. पो. करडकवाडी (मुकिंदपुर), ता-नेवासा, जि-अहमदनगर. वडिल रयत शिक्षण संस्थेमध्ये मुख्याध्यापक असल्याने शिक्षणानिमित्त अहमदनगर जिल्ह्यातील अनेक खेडेगावांमधील शाळांमध्ये झाले. पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, लोणी येथे पदवी अन बोरावके महाविद्यालयात रसायनशास्त्रातील पदव्युत्तर पदवी (एम एस्सी) घेतली. सुरुवातीला पुणे अन जालना इथे चाटे कोचिंग क्लासेसमध्ये चार महिने अन नंतर पुण्यात एका छोट्या रसायन कंपनीत दोन महिने नोकरी केली अन मग जगप्रसिद्ध 'सिप्ला' (Cipla) कंपनीमध्ये फेब्रुवारी २००१ मध्ये दाखल झालो. येथे डॉ. सतीश गौड याच्या मार्गदर्शनाखाली संशोधन अन विकास विभागामध्ये काम करु लागलो. डॉ. गौड सरानी माझ्या कामावर खुष होऊन मला कंपनीत बढती दिली, पण त्याचवेळी मोठ्या पदावर जायचे असले तर पीएच. डी पूर्ण करणे किती गरजेचे आहे हेही समजावले. त्यांनी नेहमीच पीएच.डी. ला जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांनी पीएच.डी. साठी अर्ज कसे करावेत, कुठे करावेत, माहिती कुठे मिळेत अशी खुपच महत्वाची माहिती दिली. त्या माहितीच्या आधारे, मग सुटीच्या दिवशी आय.आय.टी. पवईच्या केंद्रीय वाचनालयामध्ये

दिवस दिवस बसून संशोधन क्षेत्रातील सध्याचे संशोधन, संशोधक अन त्यांचे संपर्काची माहिती मिळवणे सुरु झाले.

ग्रामीण भागात शिक्षण झाल्याने येथील सर्वच विद्यार्थ्यांप्रमाणे एम एस्सी नंतर एक नोकरी मिळवणे, हेच एकमेव लक्ष समोर ठेवले जाते. शहरी भागात विद्यार्थ्यांना ज्या प्रकारचे माहितीचे स्त्रोत उपलब्ध असतात, परदेशातील उच्च शिक्षण अन नोकरीच्या संधी जितक्या सहजतेने उपलब्ध होतात, ते ग्रामीण भागात आजही उपलब्ध नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना/विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशी जाणे आजही अशक्य वाटते. पंचक्रोशीत एखाद दुसरे असे उदाहरण आढळून येते.

अखेर जुलै २००२ मध्ये मला स्पेन मधील बास्क प्रदेशाचे विद्यापीठ, सॅन सेबास्टीयन येथे प्रवेश मिळाला. परंतु आता अडचण मोठी होती. नोकरीमध्ये दीड वर्षे झाल्यानंतर वडील पुन्हा शिक्षणासाठी नोकरी सोडायला नकार देत होते. कुटुंबातील आणि पूर्ण गावातील इतर कुणीही यापुर्वी परदेशी शिक्षणासाठी गेलेले नसल्याने या 'प्रकारावर' कुटुंबातील अनेकांचा विश्वासच बसत नव्हता. त्यामुळे नोकरी सोडून परदेशी जाण्याला सर्वांचा विरोधच झाला. परंतु माझा निश्चय पक्का झालेलाच होता. दुसरी अडचण होती ती पैश्याची. नोकरीतील बरेचसे पैसे पीएच.डी. अर्ज करण्यासाठीच खर्च झाल्याने जवळ शिल्लक अशी नव्हतीच. त्यावेळी पनवेलला एक तास इंटरनेटचा दर चाळीस रुपये इतका होता. अन अर्ज केवळ इंटरनेटवरूनच पाठवले जाऊ शकत होते. अनेकदा इंटरनेट स्पीड इतका कमी असे कि एक तासात एखादाच मेल पाठवला जाऊ शकत असे! म्हणून मग पुण्याला जाऊन दिवसभर नेट कॅफे मध्ये बसून अर्ज पाठवायला लागत असत. रविवारी सकाळी ६ ला पनवेलहून निघायचे, सहकारनगरला दिवसभर सायबर कॅफेमध्ये बसायचे अन संध्याकाळी पुन्हा पनवेल! दुसऱ्या दिवशी कामावर हजर.. असे तब्बल एक वर्षे चालले. त्यामुळे व्हिसा, विमानप्रवास ह्यांना पैसे आणायचे कुठून हा प्रश्न उभा राहिला..! त्याबद्द्ल

मी कंपनीतील वरिष्ठ अधिकारी असेलेले माझे मित्र श्री. संजय म्हस्के आणि श्री. मनोहर सुर्वे ह्यांना बोललो. दुसऱ्या दिवशी श्री सुर्वे साहेबांनी पंचवीस हजारांची रोकड माझ्या हाती दिली. श्री म्हस्के साहेबांनी दहा हजारांची रक्कम दिली.... त्यातूनच व्हिसाची फी अन विमान तिकिटाचे पैसे दिले.

विसा मिळवण्यासाठी दिल्लीला जावे लागले. स्पेनची मुंबई मधील वकीलात विसाची कामे करत नाही. दिल्लीत प्रथमच जाणे, तिथे जवळपास एक महिना राहणे अन विसासाठी स्पॅनिश वकिलातीच्या चकरा मारणे हे मोठे दिव्यच असते. पण तत्कालीन अवजड उद्योग मंत्री श्री बाळासाहेब विखे-पाटील ह्यांचे दिल्ली येथील कार्यालय अन त्यांचे तत्कालीन सचिव श्री अविनाश ढाकणे साहेब, ह्यांच्या सहकार्यामुळे दिल्लीतील कामांना खुपच मदत झाली. दिल्लीमध्ये पहिल्यांदाच गेलेलो असताना, राहण्याचा ठिकाणा नसताना, महाराष्ट्र सदनात 'चिठ्ठी' शिवाय जागा मिळु शकत नसताना, अक्षरशः रडकुंडीला आलेलो मी, जेंव्हा उद्योग मंत्रालयात कुठलीही ओळख नसूनही श्री अविनाश ढाकणे साहेबांना भेटलो, तेंव्हा आवश्यक त्या सर्व मदतीसाठीचे आश्वासक शब्द मला खुपच धीर देऊन गेले..!

एक महिन्याच्या प्रयत्नांनंतर मला विसा मिळाला. कुटुंबात अन बहुतेक मित्र परिवारात पहिलाच पासपोर्ट धारक असल्याने विसा ही खुपच मोठी लढाई होती! एक वेळ तर, कागदपत्रांच्या जंजाळात अडकल्याने 'नको ते परदेशी शिक्षण' असा विचार करत दिल्लीच्या रायसीना हिल अर्थात संसद भवन परिसरात फिरत असायचो!

त्यानंतर मुळ गावी येउन स्टेट बॅन्क ऑफ इंडिया, शाखा नेवासा इथे शैक्षणिक कर्जा साठी अर्ज केला. ही प्रक्रिया खुपच किचकट आहे. पंधरा दिवस, दिवस अन रात्र, योग्य कागदपत्रे, त्यावर योग्य ते अटेस्टेशनचे शिक्के, इतर कुठल्याही बँन्केचे कर्ज नाही असे ना हरकत प्रमाणपत्र (नेवासा शहरात चार बॅन्का वगळता २० पतसंस्था आहेत, हे प्रथमच कळाले!) अशी कागदपत्रे जमा केली. ३० सप्टेंबरला मला स्पेनला जायचे होते. पण २२

सप्टेंबरला शेवटी विमा पॉलीसी मुंबईला जाऊन 'नोंदवून' या असे बॅन्क मॅनेजर साहेबांनी फर्मान सोडताच, मी तर कर्ज मिळण्याचे आशाच सोडून दिली... शेवटी बॅंकेच्या साहेबांनी इतर कागदपत्रे पूर्ण असल्याने, विमा पोलीसी नंतर नोंदवून दिली तरी चालेल असा शेरा मारुन कर्ज रक्कम माझ्या खात्यावर जमा केली. मग २५ सप्टेंबरला मुंबईला विमा पॉलीसी नोंदवली.

शेवटच्या दोन दिवसात आवश्यक ते कपडे/वस्तु यांची खरेदी झाली. अन ३० सप्टेंबर २००२ ला रात्री दोन वाजता विमानाने मुंबई विमानतळाहून इटलीतील मिलान मार्गे स्पेन मधील बार्सिलोनाकडे प्रयान केले! १ ऑक्टोबरला मी स्पेन मधील सॅन सेबास्टीयन शहरात पोहचलो. तिथे माझे पीएच.डी.चे प्राध्यापक विमानतळावर घ्यायला आले होते. संध्याकाळी नऊ वाजता होस्टेलवर पोहचलो. तिथे माझी स्वतंत्र खोली अन वरच्या मजल्यावर असलेले एकत्रित स्वयंपाकघर दाखवले. पहिल्यांदाच युरोपात आल्याने भारतीय विद्यार्थी जीवना मध्ये 'जेवण बनवणे' कधीच घडलेले नसल्याने मी स्वयंपाकघराकडे लक्ष दिले नाही! पण याच स्वयंपाकघरात नंतर मात्र कित्येक तास 'प्रयोग' करावे लागले. सुरुवातीची फेलोशिप तुटपुंजी असल्याने दोन वेळ कॅन्टीनचे जेवण परवडत नव्हते. त्यामुळे दुपारी कॅन्टीन अन संध्याकाळी ’भाजलेले अन जाळलेले’च्या सीमारेषेवरील खिचडीचे प्रकार खाल्ले जात! अनेकदा दूध, फळे, ब्रेड, अंडी ह्यावरच समाधान मानावे लागे. संशोधनासाठी/अभ्यासासाठी द्यावा लागणारा वेळ अन खाण्याची आबाळ ह्यांचा योग्य परिणाम पुढील चार वर्षे तब्येतीवर होत राहिलाच! स्पेनमधील युरोपियन विद्यार्थी मात्र अंमळ स्वावलंबी होते. खाण्याच्या पद्धती अन प्रकार वेगळे असल्याने २० मिनिटापेक्षा जास्त काळ ही मुले स्वयंपाकघरात थांबत नसत. मी मात्र दोन तीन तास भांडी अन गॅसशी कबड्डी खेळत असे!

युरोपातील विद्यापीठ खुपच समृद्ध वाटले. पुस्तके, प्रयोगशाळेतील अत्याधुनिक उपकरणे, नवीन केमीकल्स अन त्याहून महत्वाचे म्हणजे, ती उपकरणे, पुस्तके अन केमीकल्स नवीन, अगदी बी.एस.सीच्या मुलांना देखील वापरण्याचे स्वातंत्र्य अन प्रोत्साहन! याउलट,

भारतात तेंव्हा अन आज २०१० साली देखील नवीन केमिकल, उपकरणे अन पुस्तके ही केवळ 'दाखवायला' ठेवली जातात. विद्यार्थ्यांना वापरणे खुप दूर, अनेक शिक्षक/प्राध्यापकांनाही ती पहायला/हाताळायला मिळत नाहीत. यामागे कदाचीत युरोपातील साधनांची उपलब्धता अन हाताळणाऱ्यांची कमतरता हा भाग आहे. अन तोच मोठा फरक भारत अन युरोप मध्ये जाणवला.

मी Organic chemistry---Asymmetric synthesis ह्या विषयावर Ph.D. केली आहे!

ह्या विषयाचा आपल्या दैनंदिन जीवनात प्रचंड वापर होतो. साधे उदाहरण द्यायचे तर दोन जण जेंव्हा एकमेकांशी हस्तांदोलन करतात, तेंव्हा ते आपण आपला उजवा हात समोरच्याच्या हातात देतात. पण समजा त्या पैकी एक डावखुरा आहे.....! काय गंमत होते ते बघा...... तो चुकून त्याचा डावा हात पुढे करतो.........!! अन मग mis-match होते!

उपलब्ध वा आपल्याला माहीती असलेल्या organic molecules पैकी बहुतेक molecules हे असे डावे किंवा उजवे असतात. महत्वाचे म्हणजे कि आपल्या शरीरातील Amino acids, carbohydrates / Sugars हे पण एका अर्थी असेच एक कल्ली असतात. म्हंजे सगळे amino acids हे L- म्हंजे उजवे तर sugars ह्या D- म्हंजे डावऱ्या असतात. त्यामुळे एखादे नविन रसायन जेंव्हा शरीरात प्रवेश करते तेंव्हा ते जर डावे वा उजवे असेल त्या नुसार ते amino acid वा sugar शी react होते.

दुसरे उदा. म्हंजे, लिंबु! लिम्बामध्ये असलेले molecule अन सन्त्र्यामध्ये असलेले molecule हे एकच organic molecule चे डावे वा उजवे रुप आहेत. त्यामुळे मूळ molecule जरी Limonine हे असले तरी, त्यांचे दोन वेग-वेगळे वास अन चव असतात.

ह्या शास्त्राचा म्हणजेच Chirality- (The Greek Word Which Means Handedness,) चा शोध मानवाला १८१५ साली लागला होता, पण त्याचा सामान्य माणसाला जबरदस्त भयानक अनुभव मात्र १९५०-१९६० ला आला. झाले असे कि, अमेरिका अन युरोपा मध्ये गरोदर स्त्रियांना दिले जाणारे एक औषध कि ज्याचे नाव Thalidomide (http://en.wikipedia.org/wiki/Thalidomide) होते, त्याचे असे डावे अन उजवे असे दोन प्रकार होते. परंतु ते विकताना डावे अन उजवे अश्या मिश्र स्वरुपात विकले जाई. अन त्या perticular औषधाचे आपल्या शरीरामधील रसायनांमुळे डाव्याचे उजव्यात वा vice versa रुपांतर होणे खुप शक्य असते, त्यामुळे ते वेगळे करता येत नाहीत. तर ह्या औषधाने गरोदर स्त्रियांच्या morning sickness वर इलाज केला जाई. पण जेंव्हा हे औषध दिले गेलेल्या स्त्रिया अधु अपंग अन विकृत बाळांना जन्म देउ लागल्या, तेंव्हा हा प्रकार उघडकीस आला. एकूण १०,००० अधु अपंग बाळं जन्माला आली. अन कित्येक हजार जन्मण्यापुर्वीच जग सोडून गेली.

त्यानंतरही मेडिकल क्षेत्रात अशी अनेक औषधे आली कि जी डावे अन उजवे ह्या दोन प्रकारात असल्याने, पेशंटना त्रास झाला. उदा. सेलाडेन नावाच्या anti-histamine ड्रग ने काही पेशंट ना heart disease झाल अन ते प्राण गमावून बसले.

ह्यामुळे जगभरातील drug administrations नी अश्या डावे अन उजवे असणाऱ्या औषधांच्या दोन्ही रुपातील biological activity तपासण्याचे बंधन कंपन्यांवर टाकले, जेणे करून आपल्याला फ़क्त उपयुक्त असणाराच molecule बाजारात विकला जाईल. सध्या पूर्ण बाजारात उपलब्ध असलेल्या औषधांपैकी ३० टक्के हे अश्या फ़क्त एकाच प्रकारच्या molecules असतात. अन बाकीच्यांची दोन्ही पण प्रकारातील biological acticity माहीती असते.

असे एकाच प्रकारचे म्हणजे केवळ डावे वा केवळ उजवे molecule बनवणे हे कष्टप्रद असते! ते अनेक प्रकारे साध्य केले जाऊ शकते.

१) नैसर्गिकरित्या उपलब्ध डाव्या वा उजव्या molecule पासून आपल्याला हवा तो औषधी molecule मिळवणे.

२) डाव्या अन उजव्याच्या मिश्रणातुण ते वेग-वेगळे करणे...... हे जिकीरीचे असते.

२) अशी एक methodology बनवणे कि जिथे एक symmetrical precursor पासून फ़क्त डावा वा फ़क्त उजवा असा molecule बनवणे........ मी ह्या तिसऱ्या भागात काम करतो.!

तर जो molecule symmetrical आहे, ( म्हणजे असं कि त्यावर विशिष्ठ रासायनिक प्रक्रिया केली असता तो फक्त डावा अथवा फ़क्त उजवा molecule देउ शकेल ) त्यापासून सुरुवात करुन फक्त डावा वा उजवा molecule मिळवणे! ह्याला asymmetric synthesis or chiral synthesis असे म्हणतात. ह्यात अनेक प्रकार आहेत. ते इथे वेळेअभावी अन मराठी भाषांतर करण्याच्या माझ्या कुवतीअभावी देउ शकत नाही.

महत्वाचे... डॉक्टर ( म्हंजे मी नव्हे, तर खरे खुरे इंजेक्शन देणारे डॉक्टर ) जेंव्हा सांगतात कि हे औषध dark and cold place ला ठेवा त्यामागे एक अर्थ असतो. कारण डावे अन उजवे molecules तापमान अन ओलावा ह्यामुळे एका form मधून दुसऱ्या form मध्ये बदलले जाऊ शकतात. अन जर दुसरा form जर विषारी असेल त त्या औषधाचे side effects भयंकर असतात. ह्यामुळे हल्ली मेडिकल दुकानाला A/c सक्तीचे केले आहे!

दैनंदिन जीवनामध्ये स्पेन मधील अडचणी या अमेरिका/इंग्लंड/कॅनडा/ऑस्ट्रेलिया या इंग्रजी भाषक देशांपेक्षा कित्येक पटीने अधिक आहेत. सर्वात मोठा अडसर आहे तो भाषेचा. इंग्रजी भाषेचे ज्ञान नसल्यानेच स्पेन देशाबद्दल इतर जग अनभिज्ञ आहे. चांगले लोक, भारतियांप्रमाणेच कुटुंबव्यवस्थेवर विश्वास असणारी समाजव्यवस्था मुलभूत संशोधनामधील चांगली कामे, याबद्दल जगाला फारशी माहिती नाहीच. मी जेंव्हा एक

वर्षानंतर भारतात परत येत होतो, तेंव्हा एक विमानतळ अधिकाऱ्याने स्पेनला शिकायला जाणारा तु पहिलाच विद्यार्थी भेटलास असे बोलून दाखवले. बार्सीलोना अन माद्रीद येथे काही भारतीय विद्यार्थी आहेत, पण इतर इंग्रजी भाषक देशांच्या मानाने अगदीच कमी... सॅन सेबास्टीयन ह्या साठ हजार लोकसंख्येच्या गावात मी एकमेव भारतीय होतो. २००८ ला पुन्हा काही कामासाठी तिथे जाणे झाले तेंव्हा तिथे अजून ५ नवीन विद्यार्थी आल्याचे कळले. आता तिथे भारतीय विद्यार्थ्यांची संख्या वाढतेय हे पाहून आनंद वाटला.

त्यामुळे इथे प्रथम स्पॅनिश भाषा शिकावी लागली. तीन महिने अजिबात इंग्रजी न येणाऱ्या एका शिक्षिकेने आम्हा सात विद्यार्थ्यांना बऱ्यापैकी बोलता येईल अशी स्पॅनिश शिकवली! विद्यापीठात काम करीत असताना सर्वांनाच इंग्रजी येत असल्याने फारशी अडचण येत नसे, पण दुकाने, बस, नवीन घर शोधताना येणाऱ्या अडचणी, प्रवासात भेटणारी स्पॅनिश लोक, स्पॅनिश लोकजीवनात असणारे महत्वाचे सण-उत्सव ह्यांत सामील होण्यासाठी स्पॅनिश भाषा येणे खुपच गरजेचे आहे. स्पॅनिश भाषा शिकल्या नंतर मात्र स्पॅनिश जीवन समरसून जगता आले. स्पॅनिश लोकनृत्य, संगीत, बैलांच्या झुंजी, स्पेनमधील अनेक शहरांतील प्रवास हा प्रचंड माहितीचा खनिजा मला मिळाला. स्पेन बरोबरच फ्रान्स, जर्मनी, बेल्जियम, ऑस्ट्रीया, इटली या देशांना भेटी देता आल्या. पाश्चात्य जीवनमान, तेथील सामान्य जनतेला उपलब्ध सोयी सुविधा, राहणीमानाचा दर्जा याबद्दल खुपच चांगली माहिती मिळाली.

स्पेन अन पाश्चात्य जगात, दुसऱ्या व्यक्तीला त्याच्या आर्थिक क्षमतेपेक्षा एक माणुस म्हणून दिले जाणारी समतेची वागणुक प्रकर्षाने जाणवते. माणसाच्या प्रगतीचा वेग कमी असला तरी त्याची हेटाळणी केली जात नाही. सामाजिक अन सार्वजनिक जीवनात अत्यंत जबाबदारीने वागणे, देशाप्रती आपली कर्तव्ये चोख बजावणे, पर्यावरण रक्षण अन पुढील पिढीला समृद्ध वारसा हस्तांतरीत करणे ह्या गोष्टी ते कटाक्षाने पाळतात! पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करताना आपण ह्या गोष्टी नेहमीच लक्षात ठेवले पाहिजे.

आमच्या रिसर्च ग्रुप मध्ये आम्ही सात देशांतील एकूण २० जण होतो. सर्व जण एकाच होस्टेलला राहत असु. एकत्र लॅबला जाणे-येणे, वीकेंडला फिरणे, यश-अपयश एकत्र साजरे करणे यामुळे चार वर्षे कशी निघून गेली कळलेही नाही! अनेक देशाचे नवे मित्र मिळाले. जागतिक दर्जाच्या वैज्ञानिक नियतकालिकांमध्ये संशोधनाचे निबंध प्रसिद्ध झाले... अन चार वर्षानंतर पीएच.डी. पूर्ण करुन भारतात परत आलो.

भारतातील दोन मोठ्या कंपन्यांमध्ये काम केल्यावर काही कारणास्तव पुन्हा परदेशात जावे लागले. आता जून २००९ पासून मी सहकुटुंब ऑस्ट्रेलिया मध्ये दोन वर्षांसाठी आलेलो आहे. येथील वास्तव्य स्पेनच्या मानाने खुपच सोयीचे आहे. कारण इथे भरपूर भारतीय आहेत अन येथील यंत्रणाही परदेशी लोकांनी/विद्यार्थ्यांनी/कामगारांनी येऊन स्थायिक व्हावे यासाठी मदत करणारी आहे.

गेली सहा वर्षे परदेशात राहिल्या नंतर मनात असलेली खंत म्हणजे निसर्गाचे वरदान अन कर्तुत्ववान व्यक्तीमत्वांची खाण असूनही आपले देशबांधव 'एकी'च्या अभावामुळे पाश्चात्यांपेक्षा कमी दर्जाच्या सोयी सुविधांचे जीवन जगत आहेत. शिक्षण, संशोधन, क्रिडा, शेती, आरोग्य यांचा आलेख दर्शवणारा मानवी विकासाचा निर्देशक पाहिला असता ही बाब प्रकर्षाने जाणवते. यामध्ये येथून पुढे बदल घडवण्यासाठीच सुशिक्षित भारतीय युवकांचे संघटन करण्याचे माझे प्रयत्न चालू आहेत. (www.kardakwadi.org)

## एकटा जीव.... सदाशिव

सन २००० मध्ये एम. एस्सी. (रसायनशास्त्र) पूर्ण करुन एक दोन छोट्या मोठ्या नोकऱ्या करुन, सिप्ला या जगप्रसिद्ध कंपनी मध्ये संशोधन आणि विकास (मराठी: आर ॲन्ड डी) विभागात रुजु झालो. कुशल मार्गदर्शक डॉ. सतीश गौड आणि जेष्ठ सहकारी श्री सुर्वे साहेब, श्री. केळकर साहेब, श्री. म्हस्के साहेब ह्यांच्या हाताखाली, नवीन कामाचे स्वरुप समजावून घेउन प्रचंड मेहनत केल्याने त्यांनी मला पीएच.डी. ला जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. दीड वर्षे अर्ज-विनंत्या झाल्यानंतर जुलै २००२ ला पीएच.डी. साठी युरोपमधील स्पेन देशामध्ये, सॅन सेबास्टीयन शहरात जाणे निश्चित झाले. पासपोर्ट, विसा सोपस्कार पूर्ण झाल्या नंतर १ ऑक्टोबर २००२ ला मी अल-इटालियाच्या विमानाने मिलान (इटली)-बार्सिलोना (स्पेन) मार्गे नियोजित शहर सॅन सेबास्टीयन (स्पेन, फ्रान्सच्या सीमेवर) ला राती ९.३० ला पोहचलो. विमानतळावर माझे पीएच.डी. चे मार्गदर्शक मला न्यायला आले होते. तेथून त्यांनी माझ्यासाठी अगोदरच ठरवलेल्या वसतीगृहावर नेले. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र रुम, रुम मध्येच एक वॉश बेसीन/ छोटा फ्रीज, रुम मध्येच इंटरनेट सुविधा, ज्यांच्याकडे संगणक नाहीत त्यांना-संगणक कक्ष, सहाव्या मजल्यावरचे अत्याधुनिक सुविधांनी सजवलेले स्वयंपाकघर, टी.व्ही./व्हिडीओ हॉल, अशा स्वप्नवत सुविधा पाहत झोपी गेलो. मला वाटले स्वयंपाकघर कश्याला ते, मी खानावळ लावेल, पण नंतर कळाले

कि इकडे असा प्रकार नसतो. आपण स्वतःच बनवायचे अन स्वतःच जेवायचे! स्वावलंबनाचा पहिला धडा!

सकाळी ९ वाजता विद्यापीठात न्यायला प्रोफेसर स्वतः आले. वसतीगृहापासून निघुन विद्यापीठाकडे जातानाच पूर्ण शहरामध्ये एक चक्कर मारली अन सुपरमार्केट, बस स्टॉप, रेल्वे स्टेशन, क्रिडांगण, फुटबॉल स्टेडियम, समुद्र किनारा, हॉटेल्स/रेस्टॉरंटस, सरकारी कार्यालये, पोलीस ठाणे, दवाखाना अशी उपयुक्त स्थळे दाखवली. शहराची ओळख अन सुरक्षिततेसाठी काही नियम सांगितल्या नंतर आम्ही विद्यापीठात गेलो. विभागप्रमुख, अन्य प्राध्यापक अन सहकाऱ्यांची ओळख करुन दिल्यानंतर इमारतीतील अन्य विभागांना भेट दिली. मुबलक ग्रंथ, मुबलक उपकरणे अन ती हाताळण्याचे स्वातंत्र्य, गुटखा-तंबाखुच्या डागाशिवाय असलेले इमारतींचे चकचकीत कोपरे, अन कोपऱ्यात बसलेले विद्यार्थी-विद्यार्थीनी. वातावरणातला मोकळेपणा, मोठेपणाचा बडेजाव नसणारे वरिष्ठ अधिकारी, प्राध्यापक अन सहकारी पाहून झाल्यावर माझ्या प्रयोगशाळेत दाखल झालो.

प्रयोगशाळा अपेक्षेप्रमाणे सुसज्ज होती. मुबलक रसायने, त्वरित पृथक्करण करण्यासाठी तंत्रज्ञ अन उपकरणे, ऑनलाईन वाचनालयात ३०० हून अधिक संशोधनासाठीची नियतकालिके, असा प्रशस्त लवाजमा होता. अपवाद वगळता (सुरक्षेचे नियम/ योग्य प्रशिक्षण प्राप्त केले नसल्यास) सर्व उपकरणे वापरता येत होती. नवीन उपकरणे अन प्रणाली शिकण्यासाठी सहकारी तत्परतेने मदत करत होतेच. सगळे काही मजेत सुरु झाले होते!

प्रयोगशाळेतील जीवनाखेरीज बाहेरचे 'विकेंड लाईफ' अन 'नाईट लाईफ' शी जुळवून घ्यायला सहकारी मदतीला होतेच! संपूर्ण विद्यापीठात अन शहरात एकमेव भारतीय असल्याने, भयानक एकटा असल्याची जाणीव होत होती. परंतु तेथील एका प्रध्यापकांनी सुरुवातीला त्यांच्या सोबत शहराच्या आसपासची सर्व प्रेक्षणीय स्थळे त्यांच्या कुटुंबासोबत फिरवून आणली. प्रयोगशाळेत सात वेगवेगळया देशांचे २० सहकारी होते. त्यातूनच मग,

संध्याकाळचे सहभोजन हा एक सोहळा ठरु लागला. अनेकांचे जेवण बनवण्याचे कच्चे-पक्के प्रयोग एकत्रित 'एन्जॉय' करु लागलो. वसतीगृहातील सहकारी देखील, 'वीकेंन्ड' वा सुटीच्या दिवशी/रात्री एकत्रितपणे सुटी साजरी करु लागलो! संशोधनामुळे फार शक्य झाले नाही, परंतु अनेक सहकाऱ्यांच्या घरी/ शेतावर जाऊन स्पॅनिश लोककला, लोकजीवन आणि शेतीबद्दल माहिती मिळु शकली. तेथील लोककला, खान-पान संस्कृती, शिक्षण, समाज, आरोग्य, वाहतुक, पर्यटन, अश्या दैनंदीन जीवनातील अनेक पैलु पाहता आहे. पाच दिवस काम अन दोन दिवस धमाल अश्या समतोल कार्यपद्धतीने अभ्यास, संशोधन अन सामाजिक जीवनाचा आनंद लुटता आला. फ्रान्स, जर्मनी, बेल्जियन, ऑस्ट्रीया, इटली असे आस-पासचे देश पाहता आले. अनेक देशांतील विद्यार्थ्यांशी संवाद करता आला, अन त्यातून कायमस्वरुपी मित्र निर्माण झाले. आज ८ वर्षानंतरही युरोप मधील अनेक मित्र इ-मेलच्या माध्यमातून संपर्कात आहेत.

पहिल्यांदा एकटा निघालो तेंव्हा मनात शंकांचे काहुर होते, पण जसजसे तिथल्या समाज जीवनात रमत गेलो, तस तसे आयुष्य अनुभवसंपन्न होत गेले. दोन भिन्न जीवन-शिक्षण पद्धतींचा अनुभव घेता आला हे सर्वात महत्वाचे. स्वावलंबन, स्वातंत्र्य, साधनांची मुबलक उपलब्धता, सार्वजनिक स्वच्छता, पारदर्शक कारभार अश्या अनेक गोष्टी अनुभवायला मिळाल्या. अडचणींवर मात करत प्रवास करत गेलो म्हणून तर, करडकवाडी सारख्या शंभर लोकवस्तीच्या गावातील एक भारत, एक डझनाहून अधिक देश फिरला हेच नवल!

# व्हिएन्ना

जर व्हिएन्नातील त्या दुकानदाराने Adolf नावाच्या तरुण पोराला रंगाऱ्याचे अथवा सुतारकीचे काम दिले असते तर काय झाले असते...? कदाचित जग दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटले गेले नसते, कदाचित ज्यु लोकांना ईस्त्राएल सारखा नवा देश स्थापन करण्याची वेळ आली नसती. अन तिथे रहाणारे मुळ अरब, पॅलेस्टाईन लोकांना आपल्याच मातृभुमीसाठी गेली ६० वर्षे रक्तपात करावा लागला नसता. अन कदाचित त्या अरबांचा अघोषित पुढारी म्हणून ओसामाला जगभर रक्तरंजित खेळ खेळायला कारण मिळाले नसते!(शेवटची शक्यता ही कदाचित अतिशयोक्तीच )

सारे जग हिटलरला जर्मन मानते पण फ़ार थोडे लोक हे जाणतात कि हिटलर जन्माने Austrian होता. मी युरोपात नविनच आलेलो असताना, इथे एक जर्मन विद्यार्थी होता, जेव्हा जेव्हा हिटलरचा विषय निघे तेव्हा तेव्हा तो आवर्जून सांगे कि हिटलर जर्मन नव्हता .....!!! अर्थात आजही जर्मनीत हिटलरला हिरो मानणारे residual amount मधे अस्तित्वात आहेतच!

तर अश्या ह्या व्हिएन्नाला जाण्याचा योग मला नुकताच आला. माझा मित्र जय अन त्याची पत्नी अर्थात माझी बहीण नलुताई ह्यांना भेटण्याच्या निमित्ताने नाताळच्या सुट्टीत व्हिएन्नाला आठ दिवस फ़िरणे झाले. खरे तर तिकडे फ़िरण्याच्या निमित्ताने वाटेत लागणाऱ्या जर्मनीतील चारु अन मयंक ह्या अजून एक मायबोलीकर दांपत्यालाही पिडण्या भेटण्याचा प्लॅन होता पण त्या लोकांनी थोडे दिवस अगोदर शहर बदलल्याने तो बेत बारगळला. हे दांपत्य माझ्या I.I.T. ansच्या अनुभवाला अपवाद आहे.(ही दोघेही I.I.T. ans आहेत विद्या विनयेन शोभते हे ह्यांना तंतोतंत लागु पडते )

Air Franceचा मागील अनुभव फ़ारसा उत्साहवर्धक नसतानाही ४०० पेक्षा ३०० लहान ह्या व्यवहारिक गणिताला जागून तिकिटे बुक केली. ह्यावेळी त्यांनी चांगलीच सेवा केली. म्हंजे एकतर मी व्हिएन्नात पोचलो तर माझे सामान अगदी मी दिलेल्या पत्त्यावर त्यांच्या माणसाने पोचवले.... काय म्हंता? कसे शक्य हे? अहो, जर विमान कंपनीने तुमचे सामान विमानप्रवासात हरवून टाकले वा भलतीकडेच पाठवले तर ते तुमच्याकडून पत्ता लिहून घेतात अन जेव्हा त्यांना सापडेल तेव्हा तुमच्या पत्त्यावर त्यांच्या माणसांकरवी पोहचतं करतात..... अर्थात २४,४८,७२ अश्या तासांच्या पटीतील वेळ लागतो. मी थोडा सुदैवी होतो, मला २४ तासात माझे सामान घरपोच मिळाले. Paris to Viennaa हे Asutrian Airlines चे विमान खुपच सही होते हे विशेषतः नमूद कारावेसे वाटते. अगदी Paris-Mumbaiच्या विमानाइतके मोठे नसले तरे खुपच प्रशस्त होते!!

व्हिएन्ना विमानतळावर जय मला घ्यायला आला होताच! तब्बल तीन वर्षाने आमची भेट होत होती. अगदी कडकडून गळाभेट झाली!!! त्याची तब्येत थोडी खराब झालीय असे म्हणलो तर, मीच जरा रुंदीला जास्त झालो असे त्याने मला सुनावले! माझा बटाटा इंझमाम झालाय का? असे मलाही क्षणभर वाटले!!

घरी पोचताच नलुताईच्या हातच्या पुरण पोळया माझी वाटच पहात होत्या! चिकार पोळया खाल्ल्या. इथल्या आठ दिवस मला आवडीचे पदार्थ खायला मिळाले. फ़र्माईश सांगितली जात होती अन ती पूर्ण होत होती! एक गंमत सांगतो, घरात लहान असल्याचे जसे तोटे असतात तसे फ़ायदेही असतात. कारण घरात हुकुम फ़क्त दोनच लोक सोडु शकतात, एक म्हणजे सर्वात मोठा अन दुसरा सर्वात लहान. मोठ्यांचे हुकुम पाळलेच जातात पण लहान्याचे काही हुकुम पाळले जातात तर काही नाही. मग? मी सर्वात लहान असल्याने, मला हे ठावुकच हे. मग मी काय करितो, तर n number of हुकुम सोडतो म्हणजे त्या पैकी काही पाळले जातातच अन लहान असूनही हवी ती गोष्ट साध्य होते. . मग तीने मला ' जावे त्यांच्या देशा ' हे पुस्तक वाचायला दिले! अलभ्य लाभ! त्या नंतर जिगसॉ पझल सारखे १००० तुकड्यांचे एक पझलही दिले. Austrian Empire ची राणी Elizabeth हीचे चित्र आहे असे समजले! पण ते पझल पाहून, अरे वा! खुप छान!! असे म्हणून मी ते बाजुला ठेवून दिले अन पुस्तकात डोके खुपसले! नंतर ' पु. लं. एक साठवण ' हेही पुस्तक वाचायला मिळाले. ( पझल सोडवण्यासारखी डोक्याला त्रास देणारे कुठलीही कृत्य ९ जानेवारी पर्यंत करायचे नाही असे ठरवलेच होते.)

दुसऱ्या दिवसापासून व्हिएन्नातील फ़िरती सुरु झाली. त्या शहरात छोटी अशी एकही वास्तु नाही. जिकडे पहावे तिकडे भव्य अन अतिभव्य इमारती! वैभवशाली Austrian Empireच्या इतिहासाचे साक्ष देत उभ्या आहेत. जुन्या नव्याचा अनोखा संगम इथे पहायला मिळतो. जशी जुनी ट्राम आहे तशीच आधुनिक ट्राम गाडीही येथील रस्त्यावरून धावताना दिसते. व्हिएन्ना ची वाहतुक व्यवस्था मोठ्या शहराला साजेशीच आहे! Bus, Train, Metro, Tram अन हेही जर नाही भावले तर अगदी जुन्या काळातील घोडा गाडीही

तुमच्या दिमतीला दिलेली आहे! ( फ़ोटो मध्ये दिसेलच्) पहिल्या दिवशी फ़क्त city centreला फ़िरलो. देशो देशीचे दुतावास, अन 'Stephansdom' हे भव्य चर्च पाहीले. तापमान खुपच कमी होते. उणे १०!!

दुसऱ्या दिवशी सकाळीच मला गदगदा हलवून उठवले गेले अन घरासमोर पहायला लावले.......... चक्क बर्फ़ पडत होते! मी तर चाटच. san sebastian समुद्र किनारी असल्याने इथे बर्फ़ पडत नाही, गेले ३ वर्षात एक दोन वेळेस पडले पण तेही एखादी सकाळ अन १ इंच फ़क्त. पण मी समोर पहात होतो ते अगदी ढिगाणे बर्फ़ पडलेले होते. मुंबईकरांच्या भाषेत, कचऱ्यासारखे जिकडे पहावे तिकडे नुसते पांढरे शुभ्र बर्फ़च पडलेले होते. थोड्या वेळाने जयचे प्रोफ़ेसर आले अन आम्हाला snow sliding ला घेवून गेले. बर्फ़ पडण्याचे तोटे तेंव्हा मला समजले. खुप अन जाड जाड कपडे घालून फ़िरावे लागते रे भो! तर लहाणपणी शिकलेल्या टुंड्रा प्रदेशातील इग्लु मध्ये रहाणाऱ्या एस्किमो लोकांप्रमाणे वेष करून आम्ही स्लेट गाडीसारख्या वाहनातून snow sliding केले!

व्हिएन्ना हे शहर एक संग्रहालयांचे सग्रहालयच आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. इथे १५० हून जास्त संग्रहालये आहेत. विविध कला, क्रिडा, प्राचीन संस्कृतीची प्रतीके, वैभवशाली साम्राज्यांचा इतिहास, जय पराजयाच्या स्मृती अन पराभूत साम्राज्याचे भग्न अवशेष, हे सगळेच अगदी नीट नेटक्या रुपात तिथे जपलेले आहे. २३ युरोला ७ निवडक संग्रहालयांचा पास मिळतो तो घेउन काही निवडक संग्रहालये पाहता येतात. Albertina हे सर्वात मोठे अन Modern Artचे संग्रहालय मात्र त्या पास ने पाहता येत नाहे. सर्व संग्रहालयांच्या प्रवेश दारात इतरही संग्रहालयांची माहीती देणारी माहितीपुस्तके उपलब्ध आहेत. वेळे अभावी मी त्या ७ मधील फ़क्त ४ संग्रहालयांनाच भेटी देवु शकलो. १)

Neurenburg: तत्कालीन राजाचा Winter Palace अन त्यासोबतची राजपुत्र अन कर्मचाऱ्यांची निवासस्थाने ह्यांचे संग्रहालयात रुपांतर केले आहे. या ३ मजली इमारतीत, संगीत अन शस्त्रांचे जतन केलेले आहे. (Music and Armour Museum) पहिल्या विभागात प्राचीन काळातील शस्त्रांचे वेग वेगळे प्रकार, नमुने, शिरस्त्राणे अन चिलखते मांडली आहेत. भाले, तलवारी, बंदुका ई.ई. घोडदळ अन पायदळातील सैन्याच्या प्रतिकृतीही मांडलेल्या आहेत. दुसऱ्या विभागात तत्कालीन संगीत वाद्यांचे जतन केलेले आहे. गिरिराजला spanish guitarra फ़ार आवडते, ह्या संग्रहालयात अगदी हजारो वर्षा पुर्वीपासूनच्या गिटारी ठेवलेल्या होत्या. तंतुवाद्ये, चर्मवाद्ये, पियानो, बासरी, इ. असे नानाविध प्रकार होते. तिसऱ्या विभागात प्राचीन रोमन अन इजिप्शीयन, ग्रीक अश्या साम्राज्यांचे अवषेश होते. तेथील पुतळे, शिलालेख अन उत्खननात जे जे मिळालेले महत्वाचे अवषेश मांडले होते. त्या सोबत उत्खनन करतानाचे फ़ोटोही लावलेले होते. अन सध्या तो भाग कसा आहे व पुर्वी कसा होता तेही फ़ोटोने दाखवलेले आहे. काही इमारतींच्या प्रतिकृती मांडताना, वास्तुशास्त्रज्ञांनी त्यांचे मुळ कलाकृतीशीचे गुणोत्तर अन त्याचा आराखडाही दिलेला होता. ही माहीती जर्मनमध्ये लावलेली होती अन दुभाषक यंत्राद्वारे तुम्ही ती ऐकुही शकता!

२) Kunsthistorisches Museum (Art history Musum) मध्ये प्राचीन इजिप्शीयन ममीच्या खुप साऱ्या प्रतिकृती मांडलेल्या होत्या. लहानपणी पुस्तकात चित्रात पाहीलेल्या त्या ममीज पहाताना जाम मजा येते! माणसाच्या सामाजिक स्थानावरून त्याची ममी कश्यात जतन केली जाईल हे ठरवले जात असावे. कारण काही ममीज ठेवण्याचे साचे खुप भव्य अन दगडी, लोखंडी होते तर काही अगदी किरकोळ लाकडी होते! त्याच museumच्या दुसऱ्या भागात तत्कालीन भांडी, अवजारे, यंत्रे, दागिणे, इ. दैनंदिन

गरजेच्या गोष्टी मांडलेल्या होत्या. ह्या वस्तु दगड, लाकुड, धातु, हाडे इ.पासून बनवले गेलेल्या होत्या. तत्कालीन मानवाची प्रगती कशी होती हे त्यातून दिसून येते. इथेच सर्वात वरच्या मजल्या वर देशो देशीची पुरातन काळापासुन्ची चलने देखील ठेवली गेली आहेत. त्यात एक ब्रिटीश कालीन भारतीय रुपया पण आहे. अगदी तांब्याच्या पैश्या पासून ते ५०० युरोच्या नविन नोटेपर्यंत सर्व चलने मांडलेली आहेत. ह्याच ठिकाणी एक मोठे ख्रिसमस ट्री पण होते!

३) Schatzkammer Museum (Treasury Museum) मध्ये तत्कालीन राजे महाराजांनी, ह्यात युरोपभर पसरलेली साम्राज्ये अन सोबत जगातील इतरही महत्वाच्या देश अन संस्कृती मध्ये वापरली गेलेले दागीने, राजवस्त्रे, अन चित्रकला ह्यांची मांडणी आहे. दागिन्यांसाठीही सोने, चांदी, माणिक, मोती, रत्ने हे माध्यम वापरले गेले आहे. राजवस्त्रावरील कोरीव काम अन भव्यता डोळे दिपवून टाकणारी आहे. रामानंद सागर अन बी आर चोप्रा कृपेकरून रामायण अन महाभारतात जे काही राजेशाही पाहिले जात होते ते इथे प्रत्यक्ष दिसते. अन तेही खरे खुरे!!

४) एका Lipizzaner Museum: मध्ये घोडेस्वारी ची कला हा विषय ठेवून घोड्यांशी संबंधित गोष्टी जतन केल्या आहेत. जुने अलंकार ( अर्थात घोड्यांचे खोगीर, लगाम इ.ई ) त्यांच्या प्रतिकृती, फ़ोटो, अन फ़िल्म्सही आहेत. तळमजल्यात एका screen वर १५ मिनिटांची घोड्यांची नृत्ये दाखवतात. जुन्या काळी किंवा अजूनही २६ जानेवारीला जसे राजपथवर घोड्यांची नृत्ये अन कसरती दाखवल्या जातात तसे. तिथे लष्करी शिस्तीत घोडे कसे सांभाळले जातात हीही माहीती मिळते. मीही कधी काळी एकदा ( च ) घोड्यावर रपेट मारली आहे त्यामुळे मला जरा बरेच कळले असे नलीनीला वाटले

Vienna शहरातून Blue Danube नावाची एक मोठी नदी वाहते. ती Austriaतील सर्वात मोठी नदी आहे असे ते मानतात. ( नेवाश्याच्या प्रवरा नदीचे पात्र रुंदीने हीच्या फ़क्त निम्मेच येईल हा भाग वेगळा! ) या नदीला खुप पूर येत असल्याने तिला दोन बायपास कॅनाॅल काढले गेले आहेत. अन ते पुढे शहर संपल्यार तिच्यात पुन्हा एकत्र केले आहेत. ह्या दोन्ही बायपासच्या मध्ये जे एक कृत्रीम बेट तयार झाले आहे तिथे खुपश्या आधुनिक इमारती बांधल्या आहेत. तिथेच एक मोठे Donau park ही विकसित केला आहे. त्याच परिसरात एक Vienna Internacional Centre ही United Nations ची एक मोठी ईमारत आहे. एके दिवशी मग त्या परिसरात गेलो. सध्या इराण प्रश्नी जागतिक समुदायाचे लक्ष लागुन राहीलेले Internacional Atomic Energy Agencyचे मुख्य कार्यालय इथे आहे. ह्यातीलच एका भारतीय अधिकाऱ्याशी जे IAEAचे councillor आहेत, त्यांच्यासोबत निघण्यापुर्वीच्या रात्री जेवणाचा योग जुळून आला. Dinnerच्या निमित्तने सद्य परिस्थिती वर चर्चाही करता आली. भारताची ह्या बाबतची भुमिका अन त्यातील नाट्यमय बदल हा एक मनोरंजक चर्चेचा विषय आहे  ह्याच परिसरात Donautrum(Donaube Tower) नावचे एक अनोखे हॉटेल आहे. कुतुबमिनार सारखे, परंतु २५३ मीटर उंचच उंच स्तंभावर १५३ मीटरला हे चक्राकार फ़िरणारे हॉटेल आहे. वरती तीन मजले आहेत प्रेक्षाकांसाठी एक गॅलरी आहे, जिथून संपूर्ण शहर बघता येते. आणि त्यावर दोन मजली रेस्टॉरंट आहे. तिथे जाण्यापुर्वीच ते बुक करावे लागते. ह्या टॉवरचे वेगळेपण म्हणजे खराब weather मध्येसुद्धा ह्या टॉवरवरचा flashing light air traffic साठी सिग्नलचे काम करतो. ह्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे १९४६ साली झालेल्या १६५ km/hच्या वादळाने सुद्धा फ़क्त वरच्या १.२५ मि. भागाने ३० से. मि.चे दोलण घेतले होते. हॉटेल मध्ये मी प्रत्यक्ष गेलो नाही पण त्याच्या पायथ्यापर्यन्त जावून आलो! खालीच जर एवढा बर्फ़ पडत असेल तर वर खुप थंडी असेल ह्याची भितीही होतीच. विमानातून Mumbai, Paris, Milan, Viennaa सारखी

शहरे पाहण्याचे अनुभव असल्याने १५३ मीटरहून ते काय दिसणार असाही एक विचार होता. विमानातून जाताना Paris to Vienna विमान Paris ला एक गोल चक्कर मारते, काय सुंदर दिसते Paris रात्री!!! अहाहा! नुसता विजेचा लखलखाट. त्या सौन्दर्याचे वर्णन करायला माझी लेखणी असमर्थ आहे!!! मुम्बई तर २९ जुलै २००५ ला अगदी दीड तास हवेत घिरट्या मारत असताना पाण्यात डुंबलेली पहीली आहे मी. त्यासाठी विमानात बसताना नेहमीच window seat पकडतो. काउंटरवरल्या सुंदर पोरी ह्या बाबतील माझ्यावर जाम फ़िदा हेत भो!

जयच्या प्रोफ़ेसरच्या घरी ३१ डिसेंबर साजरा केला. तिथे प्रोफ़ेसरने निमंत्रित पाहुण्यांसाठी एक खेळ आयोजित केला अन त्याला बक्षिसे दिली गेली. जाम बक्षिसे जिंकली. Herbal medicinal chemistryचे एक उपयुक्त पुस्तकही मिळाले. त्यांच्याच घराच्या वरच्या मजल्याच्या गच्चितून Fire works ची आतिशबाजीही पाहीली.

आठ दिवसाच्या व्हिएन्ना वास्तव्यातून निघताना जरा जड गेले. निघतानाचा शेवटचा विमानतळापर्यंतचा प्रवास प्रोफेसरच्या गाडीतून झाला. vienna तल्या सगळ्या वाहतुक व्यवस्थेचा मी पुरेपुर फायदा घेतला. Vienna विमानतळाहून विमानाने उड्डान करताना खिडकीतून खाली पाहीले तर सारे शहर पांढरी शुभ्र गोधडी लपेटून निद्रिस्त पडलेले होते!......... पॅरीस विमानतळावर आलो. पुढील विमानाला ३ तास अवकाश होता. एका air franceच्या office समोरील कक्षात बसलो होतो. तासाभराने अचानक तिथे कमांडो आले. विमानतळ अन आयफ़ेल टॉवर परिसरात शस्त्रधारी कमांडो ची उपस्थीती लक्षणीय असते. आजु बाजुचे प्रवासी त्यांनी उठवून दिले...... मला वाटले मला पकडायला आलेत कि

मला security द्यायला आलेत? मी तर काय security मागितली नव्हती, मग पकडायलाच आले असावे असा संशय आला?

थोड्या वेळाने एका सुंदरी कमांडो ने कि जिच्याकडे गन पण होती ( तुझं आहे तुजपाशी नाटकात पु. लं. नी दांडपट्टे फ़िरवणाऱ्या तरुणींवर कोटी केली होती, त्यांनी जर गनधारी तरुणी पाहीली असती त ते काय म्हणाले असते........ !!! असो. ) मला तिथून जायला सांगितले. मग तिथले दुकाने अन air franceचे office ही बंद केली गेली अन प्रवाशी बाजुला केले गेले. थोड्या वेळाने मग एक unattended handbag मुळे हा प्रकार घडल्याचे समजले.

बिल्बावला जाणाऱ्या विमानात बसलो तर पडणाऱ्या अगदी किरकोळ बर्फ़ानेही ते छोटे विमान उडु शकत नव्हते. एक तास वाट पाहून अन मग पंखांवर de-iceing करून एकदाचे विमान रवाना केले गेले! ढगाच्या वर जाइस्तोवर शंकाच होती पण मग वर एकदम लक्ख सुर्यप्रकाश दिसला अन मन आनंदले वगैरे.......!!! spain ला उतरलो तर नेहमीप्रमणे पाऊस चालू होता.......... आ.भो. आ. क. फ़. असे म्हणून आपला घराकडे निघालो.......

Vienna भेटीत नलीनीने मला अनेक पाककृतींचे प्रशिक्षण दिले अन गेले आठवडाभर मी उजळणी करितो हे. एका वेळी एकच भाजी ( मी पुर्वी सर्व भाज्या एकत्र करून शिजवत असे. अगदी कंदमुळे वगैरे प्रकारासारखे लागते ते! ) भात, पिठले अन चपात्या अगदीच जमु लागल्या आहेत असे दिसतेय. तिकडे वाफ़ेच्या शक्ती ने जेम्स वॅट ने आख्खी औद्योगिक क्रांती घडवली पण भात शिजवताना भांडे झाकून ठेवावे ही अक्कल आम्हाला आत्ताशी आली! चपात्या तर सही बनताहेत. पहीला प्रयत्न ऑस्ट्रेलिया खंडाशी साधर्म्य दाखवत होता, तर

दुसरा काश्मीर सारखा ( आटा पाकिस्तानी आहे, बहुतेक त्यामुळे ) पण गोल चपात्याही एक न एक दिवस बनतील अशी आशा (= hope) मनात ठेवून प्रयत्न चालू आहेत!

Vienna भेटीचा अजून एक लक्षात राहण्या जोगा घटक म्हणजे जयची लॅब. मी काम करितो ती लॅब फ़ारशी modern नाही. Cipla ची lab ह्या मानाने पुढारलेली होती. पण जय ची लॅब एकदम सही आहे. मुख्य म्हणजे user friendly उपकरणे कि जी त्याच्या प्रोफ़ेसर ने स्वतः design करून बनवून घेतली आहेत ते अप्रतीमच आहे! अन तिथे उपलब्ध असलेला chemistry database माझ्या सध्याच्या database पेक्षा खुप मोठा आहे. बरेच नविन शिकायलाही मिळाले.

अश्या रितीने, जिवलगांच्या भेटी, थोडेसे पर्यटन, अन उलिसे केमिस्ट्रीचे प्रयोग ह्यांनी मिळून नाताळचा vienna दौरा यशस्वी रित्या पार पडला. museam मध्ये फ़ोटो काढताना प्रकाश रचना अशी केलेली आहे कि फ़ोटो मध्ये खुप reflections येतात. प्रत्येक object चा अगदी जवळ जाऊन फ़ोटो घेतला तरच तो ठिक येण्याची शक्यता असते. या अडचणीवर मात करून नलीनीने चांगले फ़ोटो टिपले आहेत. ( मी फ़क्त पोज घेउन उभा रहायचो!! ) विशेषतः अनेक वस्तुंची मांडणी अन सजावट ह्यांचे फ़ोटो घेण्याचे कारण म्हंजे इथे कुणी संग्रहालयाशी संबंधित वाचक असतील तर त्यानाही उपयोग व्हावा. बाकी कलाकृती खुप पाहण्यासारख्या आहेत, Kunsthistoriesche museum मधले चित्रकलेचे दालन तर एक एक चित्र तासंतास पाहता येतील. Pha आणि Rachana सारखे कलाकार असतील तर! मी मात्र एका तासात सगळी चित्रे पाहिली तत्कालीन लोककला, अन येशुचे जीवन असे विषय आहेत! एकवेळ अवश्य पाहण्यासारखे ठिकाण एवढे नोंद करावेसे वाटते!!!

# गांव हरवलेला माणुस

हा लेख मेलबर्न, ऑस्ट्रेलिया येथे एप्रिल २०१० मध्ये झालेल्या 'अखिल ऑस्ट्रेलिया मराठी संमेलना' निमित्त प्रकाशित केलेल्या "हितगुज' विशेषांका मध्ये प्रसिद्ध झाला होता. विशेषांकाचे प्रकाशन जेष्ठ अभिनेते श्री. विक्रम गोखले ह्यांचे हस्ते झाले होते - श्री. भारत करडक

प्रसंग १:

स्पेन मधील एक समुद्र किनारा. नेहमीप्रमाणे शुक्रवारी संध्याकाळी समुद्रकिनाऱ्यावर फिरत असताना एक आशियायी चेहऱ्याने ओळखीचे स्मित दिले. मीही हसलो. पुर्ण गावात मी एकटाच भारतीय असल्याने कुणी भारतीय वा आशियायी दिसला कि मी लगेच दोन शब्द बोलायला बघतो. यावेळी, समोरचा चेहराही बोलायला जास्त उत्सुक आहे असे वाटले. साधारण पन्नाशीचे वय, काळा रंग, मजबुत शरीर, चेहऱ्यावर एका जखमेचा ठळक व्रण! तो श्रीलंकेचा होता, भारताबद्दल विषेश आस्था होती. बाळासाहेब ठाकरे अन इंदिरा गांधींबद्दल अत्यंत आदराने बोलला. त्यांच्या आयुष्यात ह्या दोघांना देवापेक्षाही वरची जागा आहे असे म्हणाला.

वीस वर्षा पुर्वी तो श्रीलंकेतील एका खेडे गावात राहत असे. त्याचे आई-वडिल, भाऊ, बहिणी अन इतर कुटुंबीय. सुखाने जीवन जगत होता. लग्नही ठरले होते..स्वपाळु दिवस होते! पण भविष्यात काही औरच लिहिलेले होते..... अचानक काही मित्रांच्या सांगण्यावरून तो तामिळ अस्मितेसाठी सुरु झालेल्या हिंसक लढ्यात ओढला गेला. हाती शस्त्र आले, अन तरुण रक्ताला साजेश्या पद्धतीने त्याने सरकारी यंत्रणे विरुद्ध बंड पुकारले. पण लढाई म्हटले कि हार जीत आलीच. एक दिवस गावावर सरकारी सैन्याने हल्ला केला. अन ह्याच्या स्वनांचा चक्काचुर झाला.. तो अन त्याचे काही साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाले पण बाकी पूर्ण गाव नष्ट झाले. सगळे कुटुंबिय अन त्याची भावी जीवनसाथी मारले गेले.

संपूर्ण कुटुंब नाहिसे झाल्यावर हिंसक मार्गाचा तिटकारा वाटु लागला. आपण मारलेल्या लोकांनाही आई वडिल भाऊ बहिण असतील .... हा विचार प्रथमच मनात आला. शस्त्र खाली टाकले. पण तथाकथित क्रांतीच्या या मार्गावर परतीचे मार्ग नसतात हे लगेच ध्यानात आले. जे साथीदार होते, तेच मारेकरी म्हणून जीवावर उठले. जीव मुठीत धरून देश सोडून परदेशात आश्रय घ्यावा लागला. दक्षिण आशियातील अनेक देश पालथे घालून शेवटी युरोपातील एका देशात आश्रय मिळाला. पण जीवावरची भिती कमी झाली नाही!

आता व्यवसायात चांगला स्थिरावला होता. आशियातील अनेक देशांतून वस्तु आणून युरोपात विकण्याच्या व्यवसायात खुप प्रगती केली होती. आर्थिक दृष्ट्या संपन्न झाला होता. मध्यंतरी एक जीवनसाथीही मिळाली होती अन दोन बछड्यांसह आयुष्य अगदी सुखात चालले होते...

पण असा एक दिवस येतो जेंव्हा 'आपल्या' कडचे कुणीतरी भेटते, अन मग जुन्या जखमा पुन्हा ताज्या होतात. जुने गाव पुन्हा आठवते. आई वडिल भाऊ बहिणी अन सर्वच जण नजरेसमोर दिसतात..... पण आता गाव हरवलेले असते अन त्याचे स्वप्न फक्त मनात घर करुन राहिलेले असते!

प्रसंग २:

युरोपातील एक प्रख्यात संशोधन संस्था. मी नुकताच पोस्ट डॉक्टरेट साठी तिथे रुजु झालेलो. पंचविसीतील एक जर्मन (!) तरुणी माझ्या लॅबला पी एच डी साठी प्रवेश घेते. सुंदर, हुषार अन अभ्यासाव्यतिरिक्त कला, संस्कृती, खेळ यांत रस असणारी! दिवसाचेच नव्हे तर आठवड्याचे वेळापत्रक काटेकोर पणे आखलेले अन एक वेळ सुर्य उगवायचा विसरेल पण पॅट्रिशिया (तिचे नाव) वेळापत्रकातील वेळ चुकु देणार नाही. सोमवारी स्विमिंग, मंगळवारी स्पॅनिश भाषा, बुधवारी टेनिस, गुरुवारी लॅटीन नाच, शुक्रवारी फ्रेंच भाषा असा संशोधनाव्यतिरिक्तच्या वेळेतील भरगच्च कार्यक्रम. शुक्रवार अन शनिवार फक्त कुटुंबाकरिता (तिचा जोडीदार त्याच शहरातील दुसऱ्या संशोधन संस्थेत पी एच डी करत होता)..!

आशियायी कुटुंबाचा अनुभव असेल तर पाश्चात्य देशांत कुटुंब फारच कृत्रिम नाती असलेले वाटते. पण पॅट्रिशियाला भारतीय/ आशियायी कुटुंब म्हटले कि स्वतःचे कुटुंब आठवायचे अन ती हळवी व्हायची.

ती दहा वर्षाची असताना पोलंड मधून तिच्या आई वडिलांसह एका रात्रीच्या खडतर प्रवासात ती जर्मन प्रदेशात आली. दहा वर्षाची असल्याने पोलंड मधील मूळ गावात तिच्या आठवणी तश्या कमीच होत्या, पण खेळातील सवंगडी, शेजारची काही कुटुंबे, सायकल शिकताना पडलेले दात, कुत्र्याचे पिल्लु! अन सर्वात महत्वाचे म्हणजे क्म्युनिस्ट तावडीतून सुटून स्वतंत्र जगात जाण्यासाठी अनेक वेळा प्रयत्न करणारी गावातील अनेक कुटुंबे!! एक प्रयत्न विफल झाला कि काही दिवस विश्रांती घेऊन पुन्हा नवीन जोडीदार शोधून (मागच्या प्रयत्नातील अनेक जण मध्यंतरी तो विचार सोडून देतात किंवा इतर मार्ग पत्करतात) तिचे आई वडिल संपुर्ण कुटुंबाला जर्मन प्रदेशात घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत.

अन एक दिवस त्यांच्या प्रयत्नांना यश येते. एक मध्यरात्री पॅट्रिशियाला नवा गांव मिळतो. तिथे ती लहानची मोठी होते. शाळा , कॉलेज, मित्र, मैत्रिणी भरपुर मिळतात. उच्च शिक्षणासाठी ती पुन्हा नव्या गावी येते..... नवनवीन देशातील मित्र भेटतात. त्यातील काही पोलंडचेही असतात... अन जुन्या गावातील कोणी आहे का? अशी पुसटशी शंका मनात घेऊन ती त्याला गावाचे नाव विचारते! अजून तिला कुणी तिच्या जुन्या गावातले कुणी भेटलेले नाही....पण तिने माघार घेतलेली नाही!!!

प्रसंग ३:

ऑस्ट्रेलियातील एक समुद्र किनारा. शुक्रवारी संध्याकाळी समुद्रावर फिरत असताना एक वृद्ध जोडपे बाकावर बसलेले दिसते. भारतीय असतील अशी शंका मनात ठेवून मी हसतो. (इथे खुप भारतीय आहेत, त्यामुळे मी बरेचदा ओळख काढायचा प्रयत्न करतो, पण समोरची व्यक्ती मात्र पाहून न पाहिल्या सारखे करुन निघुन जाते!) पण मग, ते जोडपेही ओळखीचे हसतात. मग मी पुढे जाऊन नमस्कार करतो अन बोलु लागतो. चक्क हिंदी भाषेत बोलु लागतात.(माझ्यासारखेच त्यांनाही मी बोलायला थांबलो म्हणून आश्चर्य वाटते!.. पहिला धागा जुळतो.)

दोघेही वयाची सत्तरी पार केलेले. केस रुपेरी पण मन तरुण. मुलगा मुलगी दोघेही डॉक्टर अन सुखी संसारात जम बसलेले. प्रापंचिक काळजी काहीच नाही. मुळचे अखंड हिंदुस्थानचे! लाहोर जवळचे. (आता ते पाकिस्तानात गेलेले) लाहोर पाकिस्तानात गेले तेंव्हाच हे जोडपे अन अशी असंख्य 'विजातीय' जोडपी पाकिस्तानातून बाहेर पडली. तरुण रक्त असल्याने आगीतून वाचले, जे काही हाती लागले ते घेउन जीव मुठीत धरुन जन्मगाव सोडून पळाले. जुन्या आठवणी ... अग्निकुंडात स्वाहा!

आफ्रिकेच्या अनेक देशां मध्ये नशीब आजमावून शेवटी दक्षिण आफ्रिकेत महात्मा गांधींची पुण्याई कामी येते. संसार चालू लागतो, मुले शिकतात. मग एक दिवस मुलांच्या

आग्रहाखातर ऑस्ट्रेलियाला येणे होते. आता नोकरीतूनही निवृत्ती झालेली. मग असेच कुणी 'आपले' भेटतात का? म्हणून फिरत राहतो. ओळख दाखवेल त्याला मनातले गाव दाखवायचे अन मनातच खुश व्हायचे! काही लोकांना किमान पुन्हा फिरुन जुण्या गावी जाण्याची शक्यता तरी आहे..पण ह्यांना तर गावच राहिला नाही! आता गांव फक्त स्वप्नात!

प्रसंग: ४

युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया इ. प्रगत देशातील एखाद्या मोठ्या शहरातील सुख-सुविधांनी युक्त अश्या घरामध्ये बसलेला 'मी'!!! वयाची २०-२५ वर्षे भारतातील छोट्या छोट्या खेड्यांमध्ये घालवल्यानंतर उच्च शिक्षण अन नंतर नोकरीसाठी गेली सात-आठ वर्षे अश्या मोठ्या मोठ्या देशातील मोठ्या मोठ्या शहरांमध्ये राहत आहे. अभ्यासाच्या काळात अभ्यास अन कामामध्ये इतका बुडलेला कि बाकी जगाचा विसर पडावा... आता अभ्यास संपुन ठराविक वेळेची नोकरी सुरु झाल्यावर मात्र, आसपास काय चाल्लेय? कसे चाल्लेय? अन मुख्य म्हंजे 'आपलं' कुणी आपलं दिसतय का? हे बघायला सुरुवात केलेली... माझ्या गावापेक्षाच नव्हे तर देशात पाहिलेल्या शहरांपेक्षाही वीज, पाणी तर मुबलक होते अन रस्तेही आरशासारखे चकाचक होते. वा! मग, थोडे ओळखीचे चेहरे दिसल्यावर अजून बरे वाटले....पण ती ओळख खुपच कृत्रिम आहे हे लक्षात आल्यावर मन खट्टु झालेले. रस्ते अन इमारतीशी बोलता येत नव्हते अन ज्यांच्याशी बोलावेसे वाटत होते, ते माझ्याकडे पाहून न पाहिल्यासारखे करत होते! जे दोन चार लोक ओळख देत होते, त्यांच्यातच मिळून मिसळून मजेत दिवस घालवत असतो! पण मनामध्ये मात्र 'गांव' आठवत राहतो. गांव हरवलेल्या माणसांमध्ये मीही सामील होतोय कि काय अशी भिती वाटायची!

अन मग असा एखादे दिवशी मग एकटा असलो कि तो श्रीलंकन मित्र आठवतो, ती जर्मन (!) पोलीश मैत्रीण आठवते, अखंड हिंदुस्तानात हरवलेल्या गावातले दादा-दादी आठवतात... मग मलाही माझा गाव आठवतो... तसा मी खुप शाळा शिकलेलो. खुप गावांत

राहिलेलो. वडिल शिक्षक असल्याने दर दोन वर्षांनी बदलीच्या गावची नवी शाळा अन नवे मित्र मला मिळायचे. पुनःश्च हरिओम तर कित्येकदा केलेला. रस्ते, वीज, पाणी तर कित्येकदा नसायचे! पण त्यामुळे 'जगणे' काही थांबले नाही. आताशा अधून मधून गावाकडे गेलो कि त्यातही बरीच प्रगती झालेली दिसते! आपणही त्यात काही हातभार लावावा असे वाटते! परदेशातून आलेले काही भारतीय आपल्या देशात काही नवे प्रकल्प सुरु करतात अशी उदाहरणे जेंव्हा स्वतः बघतो किंवा वृत्तपत्रांत वाचतो, तेंव्हा मनाला उभारी मिळते. आपल्या गावात नवे जग निर्माण करायला मी स्वतःच प्रत्यक्ष गावी जायला हवे असे काही नाही! दळणवळण अन दूरसंचारातील प्रगतीचा आधार घेतला तर दूर देशात राहूनही मी माझा गाव माझ्या स्वप्नांप्रमाणे सजवू शकतो! नव्हे तो मी सजवणारच असा एक विश्वास मनात येतो. मग मीही एक प्रयत्न करतो. दोन वर्षापुर्वी गावाकडे (बंधुंना सांगुन) दूध व्यवसायाची सुरुवात केली होती. खुप छान प्रतिसाद मिळाला. जवळपास चारशे कुटुंबाला त्याचा फायदा झाला. प्रकल्प छान चालल्याने त्यांचा आता अपेक्षा अजून वाढल्यात! अन मलाही, आपल्याच 'गावात' आपण एक पूर्णपणे 'नवे जग' निर्माण करु शकतो हा आत्मविश्वास मनात दृढ झाला!!! श्रीलंकन मित्र, जर्मन मैत्रीण अन अखंड हिंदुस्थानी दादा-दादीपेक्षा माझे नशीब थोडे चांगले होते अन म्हणून त्यांच्या सारखे 'गांव हरवलेला माणुस' झालो नाही याचा अतिशय आनंद झाला!

(मनोगतः माझ्या सारखे अनेक जण दूरदेशी वसलेले असतील. त्यांनाही त्यांचा गांव आठवत असेल. व्यावहारिक अन वास्तव अडचणींमुळे काही लोक पुन्हा गावाकडे नाही जाऊ शकत. पण दूरदेशातून आपल्या गावात एक नवे जग निर्माण तर करु शकतात!! अशा समविचारी लोकांना एक व्यासपीठ मिळवून दिले आहे ते 'ग्रंथाली प्रकाशन"चे श्री. दिनकर गांगल साहेब ह्यांनी 'स्व.. देश' या श्री. भुषण केळकर यांनी संपादित केलेल्या पुस्तकाच्या रुपाने! परदेशात शिक्षण वा नोकरी निमित्ताने पाच-दहा वर्षे राहून मग भारतात परत आलेली अन स्वतःचा व्यवसाय वा आवडीचे सामाजिक प्रकल्प सुरु केलेली २५ प्रातिनिधिक

उदाहरणे त्यात दिलेली आहेत. 'स्व..देश' हे केवळ पुस्तक न राहता ती एक चळवळ झालीये अश्या समविचारी लोकांना एकत्र आणणारी अन दिपस्तंभाप्रमाणे मार्ग दाखवणारी! )

# सुरू करायचंय एक गुऱ्हाळ!

सदर लेख दि. २२ ऑगस्ट २०१०च्या 'दैनिक सकाळ'च्या 'सप्तरंग' पुरवणी मध्ये प्रकाशित केला गेला होता.

शेतकरी तरूण...

मी मूळचा नगर जिल्ह्यातील एका शेतकरी कुटुंबातील आहे. एकत्र कुटुंबात वाढलो. वडील शिक्षक होते (आता निवृत्त झाले आहेत), अन्य चुलते आणि चुलत भाऊ हे सर्व जण शेतकरी. माझ्या कुटुंबाची नगर जिल्ह्यात नेवासा तालुक्यात करडकवाडी (नेवासा फाटा-मुकिंदपूर) येथे शेती आहे. माझे शिक्षण पी. एच. डी. (रसायन शास्त्र) इतके झालेले आहे. भारतातील सिप्ला आणि रिलायन्स या मोठ्या कंपन्यांमध्ये 'संशोधक' म्हणून तीन वर्षे मी काम केले. स्पेन, जर्मनी, फ्रांस, बेल्जीयम, इटली, ओस्ट्रीया, ऑस्ट्रेलिया आदी देशांमध्ये गेली आठ वर्षे वास्तव्य आणि प्रवास केलेला आहे. कुटुंबातील आठ भावांमध्ये फक्त मी एकटाच नोकरी करतो! दोन वर्षांपूर्वी माझ्या बंधूंनी एक दूध प्रकल्प सुरु केला आणि तो अत्यंत चांगल्या प्रकारे सुरु आहे. (www.kardakwadi.org) एकूण सांगायचं, तर मी बालपण खेड्यामध्ये गेलेला, सुदैवाने शिक्षणाचा सूर गवसलेला, शेतीशी घट्ट नाळ असलेला, उच्च शिक्षणासाठी तात्पुरता परदेशी राहत असलेला, एक प्रातिनिधिक ग्रामीण युवक आहे.

आजवर घेतलेल्या शिक्षणाचा आणि देश-विदेशी केलेल्या प्रवास आणि वास्तव्याचा उपयोग भावी काळात ग्रामीण भागातील माझ्यासारख्याच तरुणांना व्हावा अशी इच्छा असणारा एक भारतीय युवक !

त्याचं स्वप्न...

ग्रामीण भागातील महत्वाची उत्पादने म्हणजे दैनंदिन जीवनात अत्यावश्यक असणारे दूध, ऊस, भाजीपाला. सहकार चळवळीने यातील दूध आणि ऊस व्यवसायाने ग्रामीण जीवन बदलवून टाकले. परंतु आज सहकार चळवळ ज्या वाईट प्रवृत्तींच्या हाती गेली आहे, ते पाहता सुशिक्षित तरुणांनी विशेषतः शेतकरी कुटुंबातील शिकलेल्या तरुणांनी एकत्र येऊन ही चळवळ हातात घेतली पाहिजे. याच विचारावर माझ्या तालुक्यातील समविचारी तरुणांना एकत्र करून असे उपक्रम/व्यवसाय सुरु करण्याचा प्रयत्न करतो आहे. दूध प्रकल्प याच धरतीवर सुरु आहे. आता गुळ निर्मिती प्रकल्प हाती घेत आहोत. जागतिक व्यापाराचा इतिहास पाहिला असता साखर उद्योगाने जगाला फक्त 'गुलामी'ची देणगी दिलेली आहे. आजही थोड्या फार फरकाने हीच परिस्थिती आहे (संदर्भ: इट्स ऑल फॉर सेल हे इंग्रजी पुस्तक). याउलट गुळाला आयुर्वेदाने गौरविलेले आहे. गुळ निर्मितीची प्रक्रिया शेकडो वर्षांपासून ग्रामोद्योगाच्या रूपाने सर्वत्र आढळते. खाण्याचा गुळ, औषधी गुळ पावडर आणि औषधी महत्व असलेली काकवी बनवून ग्रामीण आणि शहरी बाजारपेठेत ग्राहकांच्या गरजेनुसार उपलब्ध करून दिली तर ग्रामीण युवकांना गावोगावी रोजगाराची संधी मिळून शहराकडे रोजगारासाठी असलेला त्यांचा ओढा कमी होईल. परंतु महागडी मशिनरी आणि कर्ज देण्यासाठी अनुत्सुक बँका या दुष्टचक्रात सध्या आपण अडकलेलो आहोत. शेतीला पतपुरवठा करणे हे बँकांच्या अतिशय जीवावर येते हे खूप जवळून अनुभवले आहे. गुळ व्यवसायासंबंधात महाराष्ट्रामध्ये पाहणी करत असताना, कोल्हापूर व परिसर वगळता इतर जिल्ह्यांमध्ये (परप्रांतीय) स्वस्त मजूर (राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार) कामावर

दिसतात. महाराष्ट्रीयन आणि तुलनेने शिकलेले लोक अजिबात आढळत नाहीत. त्यामुळे गुऱ्हाळ घरेही अत्यंत विस्कळीत, अस्वच्छ, अनियोजित दिसतात. त्यामुळे मी जेव्हा गुऱ्हाळ सुरु करायचे म्हणतो तेव्हा सोबतचे मित्र 'पाहण्यासारखे' चेहरे करतात! पण मला असे वाटते की, मी या व्यवसायाला सुनियोजीत स्वरूप देऊ शकतो. दूध आणि साखरेप्रमाणेच गुळ निर्मितीलादेखील शिक्षित मजूर, ठरलेले कामाचे तास, अत्याधुनिक यंत्र सामग्री, सुरक्षेचे सर्व नियम अमलात आणलेली एक कंपनी/कारखाना असे स्वरूप देता येईल. त्यावेळी जे 'ग्लॅमर' या व्यवसायाला मिळेल त्यामुळे परिसरातील शेतकरी अधिक सुखी होईल. एकाच कुटुंबाची निरंकुश सत्ता असणाऱ्या 'सहकारी' कारखान्यावर त्याला अवलंबून राहावे लागणार नाही.

सारं कशासाठी...?

शेती हा शाश्वत धंदा आहे. त्यामुळे शेतीला व्यावसायिक दृष्टीने पाहण्याची गरज आहे. अडाणी आणि दुसरे काही मिळत नाही, म्हणून करायचे ते काम नाही. हे ग्रामीण युवकांच्या मनावर रुजवायचे आहे. ज्याप्रमाणे सात समविचारी अभियंते एकत्र येऊन 'इन्फोसिस' सारखी एक जागतिक दर्जाची 'सेवा क्षेत्रातील' कंपनी सुरु करू शकतात, त्याचप्रमाणे असे सात 'वेडे' शेतकरी एकत्रित येऊन जागतिक दर्जाची शेती उत्पादनांची कंपनी सुरु करू शकतील का? या प्रशाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करायचा आहे. 'बॅकवर्ड इंटिग्रेशन' या तत्त्वाला धरून स्वर्गीय धीरूभाई अंबानी यांनी तेल उत्पादनात जागतिक दर्जाची कंपनी निर्माण केली. केवळ कच्चा माल 'पिकवणाऱ्या' शेतकऱ्याला 'उत्पादन, प्रक्रिया आणि विक्री' या तीनही क्षेत्रात एकाच साखळीने बांधून 'फॉरवर्ड' विचारांचे आणि कृतीचे आधुनिक शेतकरी उभे करणे हे माझे उद्दिष्ट आहे. 'शिकला तितका हुकला' हे माझ्या शेतकरी आजोबांचे वाक्य मला नेहमी आठवते. 'दोन बुक' शिकलेला मुलगा शेतात काम करायला तयार होत नाही अन त्यामुळे तो 'हुकतो' हे आजोबांचे गणित मला दुरुस्त करायचे आहे.

पीएच.डी. करून, प्रदेशात काही वर्षे राहून पुन्हा शेती करता येते. त्यात लाज वाटण्यासारखे काहीही नसते, हा संदेश ग्रामीण सुशिक्षित युवकांपर्यंत पोहाचवायचा आहे. आणि त्यादृष्टीने का होईना पण शेतीत ग्लॅमर आणता येते, हा प्रयोग करून पहायचा आहे.

सर्वात शेवटी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, दूध, गुळ अन भाजीपाला या सर्वच क्षेत्रात हा प्रयोग राबवल्यास महात्मा गांधींची ग्रामस्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात येईल! 'खेड्याकडे चला' या गांधीजींच्या शिकवणीवर काम करताना जगाला 'वैश्विक खेडे' मानणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या भूमीमध्ये एका नवा विचार फुलवायचा आहे!

# परदेशातील शिक्षणाच्या संधी

परदेशात उच्च-शिक्षणासाठी जाणे, हे बहुतेक जिज्ञासु विद्यार्थ्यांचे ध्येय असते. साधनांची मुबलकता, मुलभुत सोयींचा विकास, शिक्षण-संशोधना साठी पोषक वातावरण, यासारखे मुद्दे त्यांचे मनात असतात. शहरातील विद्यार्थ्यांना याबद्द्ल माहिती मिळणे सहज शक्य होते, परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशी माहिती मिळणे खुपच अवघड असते. म्हणून, ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना माहिती पुरवण्यासाठी हा प्रयत्न.

परदेशात शिक्षणासाठी दोन प्रकारे जाता येते.

१) शिक्षणाचा खर्च स्वतः भागवण्याची क्षमता असणे.

२) उत्कृष्ठ गुणांची अन अनुभवाची शिदोरी सोबत घेउन परकीय विद्यापीठाकडून शिष्यवृत्ती मिळवून.

पहिल्या प्रकारातील विद्यार्थी हे खुपच कमी असतील. ग्रामीण भागातील विद्यार्थी इतका मोठा खर्च पेलवु शकत नाही. शक्यतो, मोठे व्यापारी, अधिकारी अन राजकारणी ह्यांचीच मुले पहिल्या प्रकारात मोडतात.

दुसऱ्या प्रकारात आपली सर्वसामान्य विद्यार्थी असतील. त्यांनी कुठल्या देशात उच्च शिक्षणासाठी जायचे ते अगोदर निश्चित करावे. इंग्रजी भाषिक देश (अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड) अन इतर देश (युरोप, रशिया) असे दोन प्रकार लक्षात असु द्यावेत. कारण, इंग्रजी भाषिक देशात जाण्यासाठी टोफेल (http://www.ets.org/toefl) अन आईएलटीएस (http://www.ielts.org/default.aspx) सारख्या इंग्रजी भाषेच्या परिक्षा बंधनकारक असतात. (अनेक युरोपीय देशांत देखील आता अश्या परिक्षा बंधनकारक केल्या जात आहेत.) काही प्रकारच्या शिष्यवृत्यांसाठी जीआरई सारख्या परिक्षा देखील द्याव्या लागतात. अश्या परिक्षांचा अभ्यास वेळीच सुरु करुन, पदवीनंतरचा वेळ वाया घालवणे टाळले जाऊ शकते. अधिक माहितीसाठी खालील लिंक पहावी.

(http://en.wikipedia.org/wiki/Graduate_Record_Examination)

काही देश/विद्यापीठे पूर्ण शिक्षणखर्च/राहण्याचा खर्च भागेल इतकी शिष्वृत्ती देत नाहीत. अशावेळी तेथे अर्ध-वेळ काम करण्याची परवानगी मिळते. अश्यावेळी तेथील भारतीय विद्यार्थी संघटना मदत करतात. परदेशात गेल्यानंतर अश्या संघटनांमध्ये सामील होणे नेहमीच मदतीचे असते. 'श्रमाला प्रतिष्ठा' या सुत्रावर परदेशातील जीवन पद्धती आधारलेली असल्याने कुठलेही काम हलके नाही, हे मनात ठेवावे. रेस्टॉरंट, दुकाने, फास्ट-फुड चेन, पेट्रोल पंप, इ. ठिकाणी कामे सहज मिळतात.

संशोधनासाठी परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी पदवी सोबत, काही अनुभव देखील मिळवला पाहिजे, कि जेणेकरुन परदेशातील शिक्षण पद्धतीत आपण सहज वावरु शकतो. कारण, परदेशात पदवीच्या विद्यार्थ्याला त्याच्या विषयातील जो प्रत्यक्ष अनुभव असतो, तो आपल्याकडीन विद्यार्थ्याला नसतो, कारण आपली शिक्षण पद्धती प्रत्यक्ष अनुभवापेक्षा पुस्तकी ज्ञानाला अन मार्कांना जास्त महत्व देते.

आपण ज्या क्षेत्रामध्ये काम करतो, त्या क्षेत्रातील शोधनिबंध ज्या वैज्ञानिक नियतकालिकामध्ये प्रसिद्ध होतात, त्यातून संशोधन संस्था अन त्यांचे विषय माहिती होउ शकतात. असे शोधनिबंध इंटरनेट वर देखील उपलब्ध असतात. त्यातून, आपल्याला हव्या असलेल्या विषयाच्या संस्थेकडे/प्राध्यापकांकडे इ-मेल ने संपर्क करावा. तो करत असताना, आपल्या अनुभवाचा, शिक्षणाचा व्यवस्थित उल्लेख करावा. त्या संदेशाला आलेल्या उत्तरावर कार्यवाही करावी. इंग्रजी जर व्यवस्थित येत नसेल, तर एक दोन मित्रांशी सल्ला मसलत करुन अर्ज लिहावा अन मगच तो पाठवावा. इंग्रजी न येण्याचा न्युनगंड बाळगु नये, परंतु आपण लिहिलेला अर्ज समोरच्या संशोधकाला कळेल याची दक्षता घ्यावी. विनाकारण अवास्तव माहिती न देता, अन पुन्हा पुन्हा इ-मेल न पाठवता, संशोधन संस्थेच्या उत्तराची वाट पहावी. ही प्रक्रिया वेळखाऊ असते, त्यामुळे अर्ज करताना संयम राखणे उत्तम! संशोधन कार्याचे मुळ स्वरूप सातत्याने अन संयमाने काम करण्यातच असते!

पासपोर्ट कसा काढावा? परदेशातील उपलब्ध संधींची माहिती कुठे मिळेल? परदेशात नोकरीची संधी कुठे मिळेल? अश्या प्रशांना उत्तर देण्यासाठी इथे काही संकेतस्थळे दिली जातील. (आपल्याला माहिती असलेली संकेतस्थळे आम्हाला जरुर सुचवा.)

http://www.mea.gov.in

http://passport.gov.in/

http://www.spainexchange.com

http://www.daad.de

http://israeleducation.net

http://www.organicworldwide.org

http://www.chemseer.com

विज्ञान आणि विशेषतः रसायन शास्त्रातील काही महत्वपूर्ण माहिती संकलीत केलेली संकेतस्थळे:

http://phoenix.tuwien.ac.at/chemistry/default.htm

http://www.czollner.at.tt/bookmarks.htm

## दुनियादारी: गेला मित्र कुणीकडे....|

नुकतेच दुनियादारी हे श्री सुहास शिरवळकर यांचे पुस्तक वाचले.... सुरुवात टु शेवट... लै भारी! एकदम कालीजच्या दिवसांची याद आली!

कॉलीजला असताना लै दुनियादारी केली .... त्यातली काही तर कॉलीजनंतर अनेक वर्षे निस्तरण्यात गेली! अश्याच एका दुनियादारीत एक जण भेटला, तो पुढे मित्र झाला....पुढील ८ वर्षे तो मित्र म्हणून वागत होता, पण "तुम्ही एखाद्याला सर्वकाळ मूर्ख बनवु शकता, तुम्ही सर्वांना काही काळ मूर्ख बनवु शकता, पण तुम्ही सर्वांना सर्वकाळ मूर्ख बनवु शकत नाही" ह्या उक्तीनुसार काही काळाने त्या मैत्रीचा बुरखा फाटायला सुरुवात झाली..

त्याच 'मित्रा' शी निगडीत गेल्या दोन वर्षा पुर्वी केलेल्या एका दुनियादारीबद्द्ल...

मी अन माझा बी एस्सीच्या शेवटच्या दिवसापासूनचा (दुसऱ्या एका दुनियादारीबद्दल कॅन्टीनवर रात्री १० वाजता बोलणे चालू असताना हा भेटला! तसा वर्गातलाच होता, पण एस. वाय. ला एक वर्ष नापास झाल्याने टी. वाय.ला तो नवीन क्लासमेटपासून तुटक

रहायचा, असो). पुढे अगदी जिवलग, मित्र अगदी जिवलग बनलो! एकाच कपात चहा पिणारे, वगैरे इत्यादी!

एम एस्सी नंतर त्याला कंपनीत नोकरी (आर अँन्ड डी विभागात) मिळाली नाही, म्हणून तो मार्केटींगला गेला. एम आर झाला. जाम वैतागला. त्याची मैत्रीण त्यावेळी शिकत होती. दरम्यान, मी एक दोन नोकऱ्या बदलून सिप्लामध्ये जॉईन झालो. एका महिन्यात त्याला सिप्लामध्ये बोलावून घेतला! (बॉस अन काही वरिष्ठ अगदीच फिदा होते माझ्या कामावर... मग मित्राचे काम करुन टाकले.) फिरतीची नोकरी सुटल्याने, अन एकाच ठिकाणची नोकरी लागल्याने, नोकरीच्या १० व्या दिवशीच त्याने त्याच्या जुन्या मैत्रीणीसोबत लग्न केले. (ती स्टोरी वेगळी! लै इंटरेस्टिंग हे! असु द्या!) सहा महिन्यानंतर त्याला ग्लेनमार्कच्या आर अॅन्ड डी चा कॉल आला. सहा महिने सिप्लात होताच. अनुभव कामी आला.... ग्लेनमार्कला चिकटला तो!

सिप्लात असताना आमच्या सिनिअर मुळे आम्हाला पी एच डी बद्दल कळले. अन मग सोबत प्रयत्न सुरु केले. त्या काळी माझ्या खिशातले सगळे पैसे असेच मित्र खात्यात खर्च व्हायचे! हिशेब कधी केला नाही.. मला घरची काहीच आर्थिक जबाबदारी नसल्याने, पगार हा कधी न भेटलेल्या पॉकेटमनीसारखा खर्च व्हायचा!

पुढे एक वर्षात मी युरोपात पी एच डी ला गेलो. त्याचेही प्रयत्न चालूच होते. पण बायको शिकत्/पार्ट टाईम नोकरी करत होती, मग त्याचे काम थोडे हातचे राखून होते. मी माझ्या लॅबला प्रयत्न करून पाहिला, पण मॅरिड म्हणून प्रोफेसर नको म्हणाले. एका फेलोशिप/पगारात दोन जण राहतील अशी परिस्थिती नव्हती.

त्याच्या बायकोचे शिक्षण संपले. गेल्या एक दोन वर्षात नेहमी भेटून तीही माझी 'चांगली मैत्रीण' झाली होती.. पुढे तिने आम्हाला राखी बांधली होते, मग काय.... मानलेली

बहीणच! मग तर हिशेबाचा प्रश्नच नव्हता..... तिनेही पार्ट टाईम नोकरी सुरु केली. तिनेही त्याच्यासाठी पोझिशन बघणे सुरु केले (मी अन मित्राने तिला हे सर्व कसे करायचे ते सांगितले होतेच. ती तशी खुपच चतुर आहे!). मग मित्राला युरोपातच दुसरीकडे पोझिशन मिळाली!

ते चार वर्षे आम्ही हवेतच होतो.... पण राहून राहून, कॉलेजचे अन सिप्ला मधले दिवस आठवत होतो.... पीएच्डी ला जरी जमले नाही, तरी पुढे कधी शक्य झाल्यास एकत्र एका ठिकाणी रहायचे अन एकत्र काम करायचे असे आम्ही दर आठवड्याला फोन/साईप्/याहु/जीमेल वर ठरवत होतो........

मी ४ वर्षात पी एच डी पूर्ण केली अन २००६ ला परत आलो. युपीएससी, टाटा कॅन्सर हॉस्पीटल मार्गे रिलायन्सला जॉईन झालो, ऑगस्ट २००७. तोवर मित्र पी एच डीच्या शेवटापर्यंत आला होता. मध्यंतरी त्याच्याच विद्यापीठात एका प्राध्यापकाशी बोलून त्याच्या बायकोला काही काम मिळवले, अन पुढे त्याच कामावर थेसिस लिहून तिलाही एक पी एच डी मिळाली होती. काही थातुर मातुर कामाला या देशात पीएच. डी. देतात, हे सिद्ध झाले! (म्हंजे हिचे शिक्षण, डिप्लोमा इंजिनीअरींग, मग बी कॉम, मग दूर शिक्षणाने कुठे एम एस्सी कश्यात तरी, अन मग पी एच डी दिली ती शैक्षणीक कामासाठी / विद्यार्थ्यांना शिकवायला काही ॲनिमेटेड फाईल बनवायच्या कामात!) असो. मी दुसऱ्याच्या क्षेत्रातल्या कामाचे मुल्यमापन करु नये. पण तिला तिच्या कामात मदत करताना मला कळलेले कामाचे स्वरुप असे होते.

शिक्षणाने माणुस मोठा होतो, त्याचे विचार प्रगल्भ होतात, पाय जमिनीवर येतात असे मला वाटते. पण दोघांना पीएचडी मिळाल्यामुळे ही दोघे जमिनीच्या वर हॅलिकॉप्टर मध्येच होती असे कळायला लागले. दोघेही कमावते झाल्याने अन युरोत कमाई झाल्याने ह्यांच्या डोक्यात हवा जाऊ लागली होती कि काय अशी शंका आली. कारण, काही जुन्या

मित्रांसोबतच ह्यांचे संबंध कारण नसताना (क्षुल्लक आर्थिक कारणांवरून?) बिघडले गेले.. गावाकडेही ह्यांच्या भेटी काही अप्रिय बातम्या देऊ लागल्या. पण तो घरोघरी असणारा वाद असतो त्यामुळे असो असो.

ऑगस्ट २००८. मित्राची पीएच्डी पूर्ण झाली. पण मित्राला परत भारतात यायचे नव्हते, अन तिथे काही पुढे काम मिळत नव्हते. परेशान झाला होता. त्याच्या बायकोची पी एचडी संपल्याने ती भारतात आली होती. कारण मध्ये दोन अडीच वर्षे ती आली नव्हती.

मी मुंबईत नोकरी करत होतो अन मला भारता बाहेर जायचे नव्हते. तश्यातच, २००७ पासून जुन्या साहेबाने बोलावणे धाडले होते कि तु ये परत इकडे युरोपात ये म्हणून! मी एक वर्षे टंगळमंगळ केली... मग ह्या मित्राला सांगितले, जा माझ्या साहेबाकडे जागा आहे, तु अर्ज कर. मी साहेबाला नाही म्हणालो, अन मित्राला त्याच दिवशी साहेबाकडे अर्ज करायला सांगितला..... साहेबाने त्याल बोलावले! (नशीब मी, साहेबाला हा माझा मित्र आहे हे सांगितले नाही, अन्यथा अजून एक रामायण घडले असते!) अन मला साहेबाने मेल केला, कि मी अजून एक भारतीय घेतला आहे, तु आता इथे ये! (मी तिथे एकटा भारतीय असल्याला कंटाळलो होतो) पण मी नाही म्हणालो.

एक गोम अशी होती, कि माझ्या साहेबाकडे तीन वर्षाची पोझिशन होती, पण पहिले एक वर्षे बायकोला डिपेंडंट व्हिसा मिळणार नव्हता, व्हिजिटर म्हणूनच तीन/सहा महिने अश्या भेटी देता येणार होत्या. माझ्या लग्नाला १ च वर्ष झालेले होते, अन घरचे लोक अश्या दूर राहण्याला विरोध करत होते. पण मग मित्र अन त्याची बायको, मला भयानक फोर्स करु लागले. शेवटी, मी अन मित्राने ने युरोपात रहायचे, अन त्याच्या अन माझ्या बायकोने मुंबईत रहायचे. व्हिजिटर व्हिसा वर तीन्/सहा महिने युरोपात जायचे असा पर्याय देऊन मला समजावले.... अन एक वर्ष, असे भुर्र्र्र्र उडून जाईल असे हेही समजावले. पण मला भारतात केवळ बायकोसोबत राहणेच नव्हे, तर स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी

थांबायचे होते. दरम्यान मी गावाकडे दूध धंदा सुरु केला होता, अन ऊस/साखर/गुळ डोक्यात बसले होते. त्यासाठी प्रयत्न सुरु होते....

तश्यात मित्राची बायको भारतात आली होती.. ती मुंबईत माझ्या घरी आली, अन मला कागदपत्रे घेऊन दिल्लीला व्हिसाला पाठवले.... पहिल्या दिल्ली भेटीत मी हात हलवत परत आलो. कारण तेच ते एम्बसी समोर उभे रहा, भारतीय परराष्ट्र सेवेचे शिक्के घ्या... ह्या सर्व प्रकाराला मी वैतागलो होतो. पाच दिवस दिल्लीत राहूनही फक्त एकच शिक्का झाला अन मी पुन्हा आलो. पण मित्राच्या बायकोने मला परत पाठवले, कि नाही, आपल्याला युरोपातच एकत्र राहायचे आहे... तु काही कर पण व्हिसा मिळव. (ते दोघे तिथे युरोपातच राजधानीच्या शहरात राहत असल्याने, त्यांना व्हिसा खुप सहज मिळाला होता. पण इथे भारतात, मुंबई दिल्लीच्या वाऱ्या करायला मी वैतागलो होतो. पी एच डीच्या वेळीही खुप त्रास झाला होता!) मग, दुसऱ्या भेटीत रेल्वे तिकिटे मिळाली नाही, तर विमानाने दिल्लीला गेलो. पण तेच! कागदपत्र पूर्ण झाली नाही.... मी मागे फिरणार होतो. पण मित्राच्या बायकोने माझ्यावर दिल्लीत असताना पण फोनवर वॉच ठेवला होताच... शेवटी एका एजंटकडे पासपोर्ट अन कागदपत्रे देऊन मी परत मुंबईला आलो.....मग दोन महिन्यात रितसर व्हिसा झाला.

मित्राची बायको युरोपला परत निघाली. माझेकडे काही दिवस राहून अन गावाकडे काही दिवस राहून ती पुन्हा युरोपला जाणार होती. अन मग ते दोघे कामाच्या ठिकाणी हजर होणार होते. तिचे विमान राखी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशीचे होते. ती आदल्या दिवशी माझेकडे मुंबईत आली. दिवसभर खरेदी केली. तिने एक दोन ठिकाणी राख्या खरेदीसाठी किंमती विचारल्या, पण महाग वाटल्याने घेतल्या नाहीत. (वाशीचे मॉल कित्ती महाग!) मीही गुपचुप एक गिफ्ट खरेदी केले. खुप महाग नव्हते, पण तिला छान काही येईल असे होते! चंपी ने सुचवले होते. ... संध्याकाळी घरी आलो, मला वाटले ती आता राखी

बांधेल. पण नाही...... ती विसरली! मग मीच तिला गिफ्ट दिले, पण ती म्हणाली कि लगेज जास्त झालेय, नको! तिला कळलेच नाही, कि हे मी युरोपात जाणाऱ्या मैत्रीणीला देत नाही तर, रक्षाबंधनानिमित्त एका (मानलेल्या) बहिणीला देतोय! ..... नातेसंबंध बहुदा विसरली होती! संध्याकाळी तिला विमानतळावर पोहचवले, अन मग मी चंपीजवळ बोललो, कि आज तिने मला दुखावले! भावाला विसरली! रक्षाबंधनच्या दिवशी इथे असूनही राखी बांधली नाही!

मग मी रिलायन्सचा राजीनामा दिला.... तिकिटे काढली.....! बायकोला अन घरच्यांना समजावले कि एक वर्ष थोडा त्रास होईल पण मग सर्व ठीक होईल. पण- किंतु- लेकिन- परंतु- अन, अन अन... माननीय परम मित्राचा मेल आला कि, तो माझ्या साहेबाकडे जाणार नाही, त्याला दुसरीकडे जास्त पगाराची पोझिशन मिळाली आहे. आता मी एकट्यानेच जावे! त्याने अन त्याच्या बायकोने दुसरीकडील पोझिशनचे व्हिसा मिळवले आहेत अन ते तिकडे जाणार आहेत! .......झाले, आमचे हात पायच गळाले..... जे नको तेच पुन्हा...... एकटेपण! (बायकोला लगेच नेता येणार नव्हते, नंतर प्रयत्न करावे लागणार होते. सहा महिने ते एक वर्षे लागु शकत होते! पोझिशन ३ वर्षाची होती, कायम पण होऊ शकत होती!.....)

मित्राला खुप विनवणी केली...... पण मित्राने मग, त्या दुसऱ्या पोझिशनला पैसे कसे जास्त मिळणार आहेत ते मला सांगितले, पटवायला बघितले. पण मग, जिथे खर्च जास्त तिथेच पगार जास्त हे सुत्र त्याला समजावले. त्याला ज्या नवीन शहरात पोझिशन होती, ते युरोपातले महाग शहरांपैकी एक आहे हेही समजावले. पण मग, तो बायकोला लगेच नेता येईल ह्या पॉइंटने अडून बसला.....अन आम्हा दोघांना एकाच लॅब मध्ये काम करायला मिळणार, ह्या सुरुवातीला मला पोझिशन अ‍ॅक्शेप्ट करायला लावताना वापरलेल्या इमोशनल वाक्याचा त्याला विसर पडला..... असो असो.

त्याने अचानक नकार देऊन, मला जो धक्का दिला तो अवर्णनीय होता... पण मला इलाज नव्हता. भारतातली नोकरी सोडून मी विमानाची तिकिटे काढून बसलो होतो. शेवटी, पत्थर पे दिल रखके, बायकोला साश्रु नयनांनी निरोप देऊन मी युरोपाला गेलो. (अगदी, इमिग्रेशनच्या टेबलावर शिक्का मारेस्तोवर काचेतून बायको कडे बघत होतो! अक्षरशः बायकोच्या डोळयात पाणी पाहून, मन पिळवटले होते. पण परिस्थिती अशी झाली होती, कि जाण्यावाचून पर्याय नव्हता!) पण युरोपात टिकलो नाही. तब्येत अन मानसिक स्थिती ढासळली अन चार महिन्यातच परत आलो. चार महिन्यात ४०० युरो फोनवर खर्च झाले हा भाग वेगळा! पण तिथे केलेल्या कामावर एक रिसर्च पेपर मिळाला! हेही नसे थोडके!

अर्थात, पुढे मित्रालाही नवीन ठिकाणी गेल्यावर एकाच महिन्यात बायकोला पुन्हा भारतात पाठवावे लागले, कारण तब्बल दहा वर्षानंतर त्यांना गुड न्युज होती! पण त्या देशात तिला लगेच प्रेग्नंसी बेनिफिट मिळू शकले नाही... मेडीकल इंन्स्युरंसला एक वर्षे वेटिंग टाईम नंतर प्रेग्नंसी बेनिफीट देतात. जर सोशल सिक्युरीटी असेल तर मग लगेच बेनिफिट मिळतात. ..... अन आज दोन वर्षानंतरही त्याला त्याच्या बायकोला युरोपात नेता आले नाही! प्रेग्नंसी अन लहान बाळाचे संगोपन ह्यात ही इकडे अन तो तिकडे असे झाले! त्याला लवकर भारतात यायचे नाही, 'युरो' मध्ये कमवायची सवय सुटत नाही.... मला फसवल्याची शिक्षा त्यांना मिळाली असे समजुन मी आनंदी होऊ शकतो, पण नाही, असे एकमेकांपासून दूर राहणे कधीही वाईट! देव करो अन त्यांना लवकरच एकाच ठिकाणी एकत्र रहायला मिळो!

***

पुढे डिसेंबर २००८ ला परत भारतात आलो. तोवर ऑस्ट्रेलियन प्रोफेसर ने बोलावणे धाडले होते! पण त्या व्हिसात ६ महिने वाया गेले. डिसेंबर २००८ ते जुन २००९ हे सहा

महिने बेकार राहिलो... विसा ची कागदे जमवणे अन अर्ज करणे.......जे नको तेच पुन्हा पुन्हा करावे लागले! पैसेही संपत आले होते. युरोपाला जाऊन येण्यातच (विमान प्रवास अन पाच महिने बेकारी ) तिथली केलेली कमाई संपली होती! भारतात नोकरी मिळणे अवघड होते, कारण मी पोस्ट डॉक मध्येच सोडली होती. रिलायन्स ची नोकरी १२ महिन्यातच सोडली होती. माझी वर्क हिस्टरी खराब झाली होती! (सुदैवाने ऑस्ट्रेलियन प्रोफेसर, जो कि माझा खुप जुना मित्रही आहे, त्याला हे सगळे माहिती होते, त्यामुळे त्यानेच धीर दिला. अन आज मी, चंपी अन ... एकत्र राहत आहोत!)...... मग एका मित्राकडून पैसे ऊसने घेतले, अन आमचे दोघांचे ऑस्ट्रेलियाचे तिकिट काढले! एका महिन्याने इथून त्याचे पैसे परत केले!

****

आज जवळपास एक वर्षानंतर जेंव्हा हा सगळा विचार करतो...तेंव्हा असे वाटते,

१) मित्रावर भरोसा ठेऊन जर भारतातील नोकरी सोडली नसती, तर भारतात बढती मिळाली असती. ग्रुप लिडर झालो असतो.

२) गावाकडे भारतातच दुधाच्या धंद्यात अजून वाढ करता आली असती. दुसरा धंदा, पक्षी- उसाचे गुर्हाळ, चालू करता आले असते.

३) भारतात असताना बाळ झाले असते. अन आता इथे एकट्याने/दुकट्याने बाळाचे करताना आमचे जे हाल होत आहेत, होणार आहेत, ते झाले नसते. चंपीला अगदीच एकटे पडल्यासारखे झाले नसते! (दोघांच्या आई इतक्या वयस्कर आहेत, कि त्यांना इथे येणे शक्य नाही. चंपी ने मला एकट्याला इथे सोडून परत जायला नकार दिला. अन बहिणी अन वहिनी पण येणे अवघड आहे. तिथे गावी अडचण!)

***

ह्या दुर्घटनेला सुरुवात होउन दोन वर्षे झाल्यानंतर, आज त्या मित्राची अन त्याच्या बायकोची प्रचंड आठवण येते आहे!

पण यातून काही शिकणार का?....... नाही, कारण दुनियादारी हा आमचा धर्म आहे, तो आम्ही पाळणारच! हम कभी नही सुधरेंगे!

# Spain Diary

Spain

MARCH 22, 2006

स्पेनच्या राजकिय इतिहासात आजचा दिवस ठळक पणे नोन्दला जाईल. गेली ४० वर्षे ज्या दहशतवाद्यांनी किमान १००० लोकांचे प्राण घेतले अन प्रचंड वित्तहानी केली त्यांनी आज जाहीररित्या शस्त्रे खाली ठेवत असल्याची घोषणा केली.

हे तसे अचानकच घडले. गेला महिनाभर या ४ राज्यात खंडणी अन स्फ़ोटांनी धुमाकुळ घातला होता. इथल्या उद्योजकांकडून खंडणी मिळाली नाही तर त्यांच्या व्यावसायिक जागांमध्ये बॉम्ब्स्फ़ोट घडत होते. अन आज अचानक त्या दहशतवाद्यांनी TV वरील थेट प्रक्षेपणात शांततेच्या मार्गावर येण्याचे जाहीर केले. त्यांच्या पत्रपरिषदेत कधी नव्हे तो स्पेनचा राष्ट्रध्वज बाजुला ठेवलेला होता, जो आजवर मी तो कित्येकदा शहरातील रस्त्यांवर जळताना पाहीला, ते लोक स्पेनच्या national TV ला थेट मुलाखत देत होते!!!

शहराचे महपौर अन राज्याचे मुख्यमंत्री ह्यांनी तर शॅम्पेन फ़ोडून आनंद साजरा केला.

पण right wing वाली popular party ह्याला काय उत्तर देते ते पाहणे रंजक ठरेल!

द्वेष अन हिंसेने कार्य सिद्धिस जात नाही हे त्यांना समजले, तसे आपल्या देशातील काही लोकांना समजले तर किती बरे होइल!!!

----

APRIL 10, 2006

काल बनगरवाडी पाहिला.

माझे वडील मुख्याध्यापक असल्याने त्यांचा बदलीच्या निमित्तने अनेक गावे अन आसपासच्या वाड्या वस्त्यावर जाणे होत असे. ह्या चित्रपटातील अनेक व्यक्तीरेखा प्रत्यक्ष पाहिल्या आहेत, अनेक प्रसंग असे आहेत कि जे मी अनुभवले आहेत, असे राहून राहून वाटत होते.

मी आई बद्दल लिहिले तेंव्हा मला Itsme नी ’आम्ही अन आमचा बाप’ हे पुस्तक वाचायला सुचवले होते. त्यानंतर देशात जाणे झाले, पण पुस्तक वाचायचा योग आला नाही. पण हा चित्रपट पाहिल्यावर मात्र माझ्या जुन्या आठवणी जाग्या झाल्यात.

वेळ मिळाला कि लिहितोच

औंधच्या राज्यांचा प्रजाहितदक्ष असा लौकिक होता, पण ह्या चित्रपटाच्या शेवटाने मात्र त्या समजाला थोडा धक्का बसला. अजून माहीती मिळवावी लागेल.

शुक्रवारी Mother Teresa de Calcutta हा spanish भाषेतला चित्रपट दाखवला गेला. छान वाटले.

---------

APRIL 12, 2006

Foreign Investors नी पैसा काढून घेतला तर market पुन्हा कोसळणार का?

हे सांगायला कुणा अर्थतज्ञाची गरज आहे असे मला वाटत नाही.

एकूणच आपल्याकडे जी बुम झालेली आहे, ते म्हंजे शरीराची प्रमाणबद्ध वाढ न होता शरीराला आलेली सुज आहे असे वाटते.

देशाची growth ही स्वयंपूर्णतेतून असावी. परक्या भांडवलावर किती अवलंबून रहायचे हे ठरले पाहीजे. भांडवलदार लोकांना देशाच्या सीमा नसतात. आज भारतात सोयी अन स्वस्त मजुर आहेत म्हणून ते भारतात गुंतवणुक करीत आहेत, उद्या दुसऱ्या कुठल्या देशाने ह्या सोयी दिल्या कि गेले तिकडे.

पण सामान्य माणसाचा उद्देश हा केवळ त्याच्या एकट्याचे जीवनकालात खुप सुख उपभोगावे असेच असते. त्यामुळे तो फ़ार पुढचा विचार करित नाही.

उदाहरण द्यायचे झाले तर

Olympic games host citiesचे देता येईल. ज्या ज्या ठिकाणी ह्या games होतात, त्या शहरात काही काळापुरते व्यवसायात बुम येते, पण नंतर मात्र त्या शहराची अर्थव्यवस्था पुरी बिघडून जाते. उभा केलेला डोलारा सांभाळण्याची कुवत राहत नाही. कारण कायम स्वरुपी उत्पन्नाचे साधनच हाताशी नसते.

देशाचे नेतृत्व करणाऱ्यांनी ह्या बाबी लक्षात घेतल्या पाहीजेत. सामान्यांचे जाऊ द्या पण नेत्यांनी किमान २५ ते ५० वर्षे पुढचा विचार केला पाहीजे. तर ते दूरदृष्टी असणारे नेतृत्व मानता येईल.

-------------

APRIL 14, 2006

काल लॅब मधील एका सहकाऱ्यासोबत फ्रान्सच्या hossegor गावामध्ये एका वार्षिक खरेदी महोत्सवाला गेलो होतो. दर वर्षी ईस्टरच्या सुटी मध्ये इथे हा महोत्सव भरतो. सुट्टीचा हंगाम असल्याने ७५ कि.मी. अंतर जायला तब्बल २ तास वेळ लागला.

कपड्याची २० ते २५ वेगवेगळ्या कंपन्यांची दुकाने अगदी ओसंडून गेली होती. त्याला जोडूनच sports articles चीही खुप सारी दालने होती.

सगळ्या स्पेन अन फ्रान्स मधली पोरे अन पोरी तिथे आलीत कि काय असी शंका मला आली. दालनांमध्ये जाण्यासाठी काही ठिकाणी तब्बल दोन दोन तास रांगा लागल्या होत्या. ती ठिकाणे सोडून मी अन सहकारी बाकी सगळी दालने धुंडाळून आलो. माझा खरेदीचा उद्देश नव्हता खिशात पैसेच नव्हते पण सहज फ़िरायला ( तिथला समुद्र किनारा खुप सही आहे) म्हणून गेलो होतो. म्हणून काही नोन्दी....

१) कुठल्याही कपड्यावर made in US or Europe दिसले नाही. विक्रीला ठेवलेले सगळे कपडे Made in Brazil, Vietanam, Indonesia, China, Thiland, Shri Lanka, Pakistan, Malysia, etc.

२)तिथली दुकाने एकाच मोठ्या दालनात न ठेवता १०० ते २०० मीटरच्या अंतरावर विखुरलेली ठेवली होती. अन आग प्रतिबंधक यंत्रणी ची जाणवण्या इतपत सोय केलेली

होती. अर्थात विक्री प्रतिनिधी असणाऱ्या smokers नी मात्र दालनाच्या प्रवेश वा exit जवळ जावून सिगारेटी फुंकण्याचे कार्य केलेच! ( हे मीरत दुर्घटनेच्या पार्श्वभुमीवर )

३)गडबड होऊ नये म्हणून प्रत्येक कंपनीचे स्वतःचे सुरक्षा रक्षक अन त्याना मदतीला स्थानिक पोलीस.

एक नीट नेटके संयोजन असलेला मोठा मेळावा अनुभवायला मिळाला!

----

APRIL 15, 2006

श्री दिनेश कृपेकरुन काल तीन नाटके पाहता आली

रणांगण : सद्य स्थितीतही माजलेल्या दुहीमुळे ह्या नाटकातील संवाद अगदी काळजाचा ठाव घेतात.

¨ दिल्लीच्या त्या जालीम तख्तावर मराठ्यांचं बुड एकदा तरी टेकु द्या की ¨

आपण इतिहासापासून काहीच शिकत नाही का? एब्राहीम गारद्याचा तो अतृप्त आत्मा अजूनही महाराष्ट्रदेशी संदेश घेऊन आलेला दिसत नाही!

सखाराम बाईंडर : सखारामला चंपी ची तत्वं पेलवली नाहीत. नेहमी खरा वागणारा सखाराम शेवटी मात्र ईतर सामान्य लोकांसारखाच वागला. पापभिरु वाटणारी लक्ष्मी शेवटी खलनायिका वाटली!

आनंद ओवरी : तुकारामाच्या भावाचं मनोगत, एकदम छान वाटतं हा एकपात्री प्रयोग पाहताना!

-------------

APRIL 18, 2006

गेल्या चार दिवसाच्या सुटी मध्यी स्पेनच्या रस्ते अपघातात १०८ लोक मरण पावले! अमर्याद वेग, दारु पिऊन वाहन चालवणे अन विनापरवाना वाहन चालवणे ह्यांचा एकत्रीत परिणाम.

मागील वर्षीही ह्याच सुटीत १०५ लोक मरण पावल्या ची माहीती दिली जात होती. तसे प्रत्येक वीकेंडला इथे १० ते १५ लोक वाहन अपघातात जातातच!

अपघाताला परिस्थीती जबाबदार आहे, वाहन चालक नाही, असा कायदा इथे आहे. त्यामुळे वाहन चालकाने कितीही मोठा अपघात घडवला तरी तो तुरुंगात जात नाहे, तर केवळ त्याचा परवाना काही काळासाठी रद्द होतो! अन त्याला जुजबी दंड होतो. इथे आता ते कायद्यात बदल करण्याचा विचार करत आहेत.

नुकताच फ़्रान्स मधील होसेगर गावाला जाताना मित्रा सोबत अपघाताचा विषय निघाला होता. त्याला म्हटलो, कि इथे वाहने उत्तम आहेत, रस्ते उत्तम आहेत मग अपघात का होतात? मला तर शंका आहे कि इथले लोक चांगले नाहीत??

अन त्यावर त्याचे उत्तर होते ... हो! इथले लोक चांगले नाहीत.

-----------

MAY 03, 2006

शेवटी प्रमोद महाजन ह्यांच्या वर मृत्यु ने जय मिळवला.........

आजवर भारतातील अनेक तरुण नेते, ऐन उमेदीच्या काळात काळाच्या पडद्याआड गेले आहेत. एक लढवय्या सैनिक तयार करण्यासाठी किती वेळ अन पैसा खर्च होतो, ह्याची ज्यांना समज आहे, त्यांना असा एक लढवय्या सेनापती गेल्यावर किती नुकसान झाले असेल ह्याचा अंदाज येईल.

प्रमोद महाजनांचा परिचय अन कर्तुत्व ह्यावर आता माध्यमांतून खुप काही लिहीले बोलले जाईल. त्यांच्या कामाच्या पद्धतीचा हा एक वेगळा अनुभव!

नगर जिल्ह्यातील कोपरगाव ची आठ दहा लोक दिल्लीला कामानिमित्त सुमो गाडी घेऊन गेले होते. दिल्ली मध्ये फ़िरताना एका ठिकाणी त्यांच्या गाडीला अपघात झाला. अन पोलीसांनी गाडी जप्त केली अन ह्यांना स्टेशनमध्ये बसवून ठेवले. इतक्या दूर प्रदेशात काय करावे अन कोणाला भेटावे हे न समजल्याने लोक भांबावले होते. कोपरगावचे एक गृहस्थ भाजपाचे राज्य सभेचे खासदार आहेत. ते काही काळ भाजपाचे प्रदेशाध्यक्षही होते. तर अपघातग्रस्त गाडीतील एका ने मग त्यांना फ़ोन केला. पण त्या खासदार गृहस्थाने ओळख दाखवायचे नाकारले.

मग सहजच एकाने श्री. प्रमोद महाजनांना फ़ोन केला, अन परिस्थिती सांगितली. त्यावर, श्री. महाजन ह्यांनी तात्काळ त्या पोलीस अधिकाऱ्याशी बोलून कोपरगावच्या ह्या लोकांची सुटका करवली. अन ह्यापुढेही काही झाले, तर मला अथवा माझ्या कार्यालयाला कळवा असा शब्दही दिला!

नेता जेंव्हा मोठा होतो, तेंव्हा तो एका पक्षाचा असू शकत नाही. श्री. महाजन ह्यांच्या जाण्याने त्यांच्या पक्षाचेच नव्हे तर राज्याचे अन देशाचंही नुकसान झाले आहे.

अश्या नेत्याला अखेरचा सलाम!!!

-----------

MAY 10, 2006

आज केतकीचे मेल आले!!! तिचे मेल आले हे पाहताच आज चांगली बातमी मिळणार. YESS तिचे लग्न ठरले!

ती पुण्यात LAW शिकत होती. मागील वर्षी भारत भेटीत ती ची भेट झाली होती, तेंव्हा मेल आय डी ची देवाणघेवाण झाली. अन आज मेल आले, तेंव्हाच समजले......... YESS!!!

केतकी, माझी DEBATING ची पार्टनर. M.SC. ला असताना आम्ही दोघांनी खुप सारी बक्षिसे जिंकली. एक वेळ अशी आली, कि आमच्या प्राचार्यांच्या केबीन मधे चषक ठेवायला जागा नाही म्हणून आता स्पर्धा बंद करा असा सल्ला प्राचार्यांनी दिला

माझ्या सारखा गबाळया पार्टनरची तिने दोन वर्षे खुपच काळजी घेतली!!

तिचा HERO, जो कि सध्या E-TV मधे निवेदक आहे. त्याची अन हीची DEBETINGच्या निमित्तानेच झालेली ओळख आहे! पोराचा आवाज सही होता, पुणेरी आहे हे विषेश! लग्न जर ते LIVE दाखवणार असतील, तर मला पहायला विसरु नका !

-----------------

दि. १६ डिसेंबर २००६

पूल्( POOL )

माझा एक लॅब मेट, तोच जो मला घोडेस्वारीला घेऊन गेला होता, तो दररोज कॅन्टीन मध्ये माझ्या सोबतच जेवण घेतो. तो जेवताना फ़ारच वेगाने जेवण करतो. मी त्याला अनेकदा इतके फ़ास्ट का जेवतो ते विचारत असतो. ( बाकीच्यांची First plate संपतच असते कि तो जेवण संपवून मोकळा!!) त्यावर तो, ¨ तु एक दिवस माझ्या घरी जेवायला ये मग तुला समजेल ¨ असे म्हणत असे. खुप दिवसाच्या प्लॅनिंग नंतर काल त्याच्या घरी जेवायला जाण्याचा योग आला. तो, त्याची गर्ल फ्रेंड, त्याचा जुळा भाउ, अजून एक मोठा भाउ त्याची आजी वय वर्षे ९५ फ़क्त!!! अगदी टुणटुणीत हे म्हातारी. प्रकृती पाहून अंदाज करायला सांगितले तर कुणी ७०च्या पुढे वय आहे असे म्हणणार नाही. स्वतःची सगळी कामे स्वतः करायला सक्षम आहे.) अन त्याचे आई बाबा, असे ८ जण होतो.

मी त्यांना जर्मनीहून आणलेले लिज्जत पापडचा नमुना नेला होता. तेलात तळलेले पापड त्यांनी जाहिरातीतील सश्याप्रमाणेच मटकावले! जेवणाच्या टेबलावर सगळे बसल्यावर, त्याने अगोदर मला हवे ते ताटात वाढून दिले अन मला म्हणे कि आता गंमत बघ! पुढच्याच क्षणाला त्या लोकांनी इतक्या स्पीड ने जेवण सुरु केले कि मला काही

कळायच्या आत सगळया अन्नाचा फ़डशा पाडला. इतके सगळे मासे, prawns , सलाड, आईसक्रीम, केक, इ.ई सगळे चट्टा मट्टा त्यात ती म्हातारी आज्जी पण मागे नव्हती! मग तो मला म्हणाला कि ¨ बघ, मी जर हळु हळु जेवलो त इथे मला उपाशीच रहावे लागले. त्यामुळे मला वेगाने जेवायची सवय आहे! ¨

जेवल्यावर स्पॅनिश प्रथेप्रमाणे फ़क्त्) त्याची आजी दुपारच्या वामकुक्षीला निघून गेली. त्याचे भाउ अन आई वडिलांशी गप्पा सुरु झाल्या. त्याचे आई वडिल आज पर्यन्त, मॉस्को, बिजिंग,रोम, प्राग, व्हिएना, इस्तंबुल, कैरो, मोरोक्को, न्युयोर्क अश्या मोठ्या शहरांना भेटी देउन आलेले आहे! मग त्यांनी जपून ठेवलेले अल्बम अन माहीती पुस्तके चाळली! अगदी वल्ली ह्रेत दोघे पण. कलासक्त प्राणी. घरातील सगळयांची पेंसिल / रंग वापरून पोर्ट्रेट काढून आणली अन भिंती वर लावलेली आहेत. देशो देशीच्या कलाकुसरीच्या असंख्य वस्तु प्रवासात गोळा केलेल्या आहेत अन आता अशी परिस्थिती आहे कि घरात अक्षरश पाय ठेवायला जागा नाहीये. आम्ही जेवायला बसलेलो ते टेबल पण फ़ोल्डिंगचे होते म्हणून त्या एव्ढ्याश्या खोलीत ८ जण बसु शकले, अन जेवल्यावर जेंव्हा टेबलाची घडी केली□मी तर चाटच एकदम, त्याचा अगदी छोटा स्टुल झाला त्यावर पण मग काही शो पिसेस ठेवली गेली! कमीत कमी जागेत एवढा पसारा पाहण्याची माझी हि तशी दुर्मीळच संधी होती.

मग तो मित्र अन त्याची गर्ल फ़्रेंड ने मला आपण बाहेर समुद्रावर जाणार आहोत असे सांगितले. रस्त्याने जाताना मला म्हणे कि एक सरप्राईज द्यायचे आहे, अन मग आम्ही एका बार मध्ये गेलो. तिथे तळमजल्यावर काही लोक चक्क pool जो कि स्नुकर अन बिलियर्ड्स सारखाच खेळ आहे) तो खेळत होती. गीत सेठी अन मायकेल परेराला टीवी वर कित्येकदा बिलियर्ड्स खेळताना पाहिले आहे. पण स्वत खेळण्याची ही पहिलीच वेळ होती. (हा मंद प्रकाशातील पुलबार नव्हता रे भो! मागे आपल्या देशातील काही शहरात मंद प्रकाशातील पुल खेळाचे फ़ॅड भलतेच वाढले होते. अन लोक येड्या सारखे पुलच्या मागे लागले होते! जाणकारांना माहिती असेलच्□ असो.) हिरव्या रंगाच्या टेबलावर १५ रंगीत बॉल, एक

पांढरा बॉल अन दोन खेळाडु असा हा डाव. कॅरम सारखाच प्रकार, फ़क्ट स्ट्रायकर हाताने मारन्या ऐवजी काठी ने मारायचा हे! इथे मी अन तो मित्र असा एक संघ अन त्याची गर्ल फ़्रेंड दुसरा संघ असे विभागलो. त्यांना दोघंनाही हा खेळ माहित असल्याने जर कुणी जास्त स्कोर करित असेल तर एकमेकांचे लक्ष विचलीत करण्याचे हर एक प्रयास केले गेले.( Everything is fair in □□.. असो!) त्याच्या मैत्रीणी ने त्याला इतके पिडले कि त्याला स्कोर करिताना काही नेमच लागेना. लहाणपणी गोट्या खेळायचा प्रचंड अनुभव असूनही इथे मला काही येईच ना, अन मग आम्ही दोन्ही गेम हरलो.

मग आम्ही तीघे समुद्रावर गेलो अन बराच वेळ भटकलो. अजून काही लॅब मेट भेटले. पुन्हा भटकलो अन रात्री हा वृत्तांत लिहून मगच झोपी गेलो!

---------------

Thursday, December 08, 2005 - 10:49 am:

काल संध्याकाळी टीव्ही वर सहारा वाळवंटातील ज्या प्रदेशावर मोरोक्को देशाने अतिक्रमण केले आहे त्या प्रदेशातील लोकांवर डॉक्युमेंटरी दाखवली. स्पॅनिश भाषेत असल्याने बरेचसे संदर्भ नीट समजले नाहीत. पण मोरोक्को राजवटीने ह्या दुर्बल जनतेला त्यांच्या मुळ प्रदेशातून हुसकावून देउन तो भाग ताब्यात घेतला अन आज ते लोक सहारा वाळवंटाच्या आतील भागात किती कष्टप्रद जीवन जगताहेत ते दाखवले. त्या उरलेल्या भुभागाचे तरी मोरोक्को कडून रक्षण व्हावे म्हणून त्यांनी जे सैन्य उभारले आहे ते अजूनही मोरोक्कोच्या अन निसर्गाच्या आक्रमणाला बळी पडतेच आहे... अन हे सगळे विस्थापित

आता युनो अन मुख्यतः स्पेनच्या आर्थिक मदतीवरच जगत आहेत. अगदी रोजच्या जीवनावश्यक बाबीही ह्या लोकांना दुसऱ्यांकडून मदत रुपानेच मिळतात.

ह्या लोकांचे असले हाल अपेष्टांचे जीणे पाहिले कि आपण स्वतः किती भाग्यवान आहोत असेच वाटल्याशिवाय राहत नाही!

...

हा व्हेनिसचा रेस्पिरेशन ब्रिज आहे. कोर्ट अन जेलला जोडणारा. फ़ाशी दिल्या जाणाऱ्या कैद्यांना इथून नेले जात असे म्हणून त्याला शेवटचा श्वास घेणारा पूल असे म्हटले जाते!

-------------

Thursday, February 16, 2006 - 2:01 pm:

काल संध्याकाळी खास विमानाने श्री दिनेश ह्यांनी पाठवलेला बहुचर्चित ’युवा” चित्रपट मी रात्रीच पाहीला. शेवट जरी सुखदायक केला असला तरी चित्रपट छान आहे. अभिषेक डावखुरा आहे हे पाहून आमचे डावखुरे मन भरून आले. त्याच्या सोबत ती गळयात कायतरी अडकलेली राणी का होती? असो.

आमच्या जिल्ह्यातही असे काही प्रकार घडले आहेत. श्री बबनराव पाचपुते, श्री. भानुदास मुरकुटे, श्री. यशवंतराव गडाख अन नंतर श्री. तुकाराम गडाख हे त्यांच्या पहिल्या निवडणुका लोकवर्गणीतून लढले. गेल्या विधानसभा निवडणुकीला आमच्या तालुक्यातील श्री. विठ्ठलराव लंघे हे अयशस्वी ठरलेले उमेदवार लोकवर्गणीतूनच लढले होते. अर्थात आज हे सर्व जण प्रस्थापित राजकारणी झालेले असल्याने त्यांची उदाहरणे आता out dated झाली आहेत.

सातारा / सांगली भागात श्री राजु शेट्टी नावाचे आमदार मात्र अजूनही सामान्य लोकांतून वर्गणी करून निवडणुका जिंकतात हे अभिनंदनीय आहे.

चांगला चित्रपट दाखवल्याबद्दल श्री दिनेश ह्यांचे आभार!

--------------

Thursday, February 23, 2006 - 5:30 pm:

चॅम्पियन्स लिग ची एक मॅच काल पहायला मिळाली. (चेल्सा इंग्लंड् विरुद्ध बार्सिलोना स्पेन.) दोन्ही बलाढ्य टीम. विशेष म्हंजे, स्कोअर जेंव्हा 1-1 होता त्यावेळी ते दोन्ही गोल हे त्या टीम ने स्कोअर केलेले self goal होते. आधी बारसाचा डिफ़ेंडर ने चुकून स्वतःच्याच टीम वर गोल केला अन मग चेल्साच्या कॅप्टन टेरि ने कोर्नर अडवताना स्वतःच्याच टीम वर गोल केला...

शेवटच्या काही मिनीटात, बार्साच्या सॅन्युअल इटो जो कि गेली तीन वर्षे आफ़्रीकेचा बेस्ट प्लेयर आहे! एका उत्कृष्ट हेडर ने गोल केला......

निकाल : बार्सा विजयी, २ वि. १

थोड्या वेळाने विचारात पडलो, कि फ़ुटबॉल मध्ये पायाने चेंडु मारावा असा साधारण समज असताना लोक डोक्याने हेडर मारुनही गोल करु शकतात. म्हंजे पाया पासून ते डोक्या पर्यंत ह्या खेळाची व्याप्ती वाढवली गेली आहे!

-------------

२८ फ़ेब्रुवारी २००६

आज आमच्या विद्यापीठा मध्ये Cambridge Univeristyच्या Prof. Peter Lawrence ह्यांचे Why we do science? वर व्याख्यान झाले. २८ फ़ेब १९५३ हा वैज्ञानिक क्षेत्रातील अत्यंत महत्वाच्या अश्या DNA Structure discoveryचा! त्या वेळी क्रिक अन वॅटसन या जोडी ने लावलेला शोध अन त्यावेळी त्यांना झालेला आनंद, त्यांनी साजरी केलेली पहिली पार्टी, जि कि केंब्रिज समोरच्या एका पब मध्ये केली गेली तो पब! ह्याची एक व्हिडिओ फ़िल्मही दाखवली गेली.

प्रो. लॉरेन्स ह्यांनी असे मत व्यक्त केले, कि, एखादा संशोधक जेंव्हा एखादा शोध लावतो, तो क्षण त्या पासून कुणीही हिरावून घेउ शकत नाही. त्या क्षणाचा आनंद हा फ़क्त

त्याचाच! नंतर कदाचित त्या यशाचे श्रेय दुसऱ्या कुणाला मिळेल, त्यातून कुणी वेगळाच एखादा पैसे कमावेल. पण शोधाचा आनंद मात्र वेगळाच!

आज publicationच्या दृष्टीने केल्या जाणाऱ्या बाजारु संशोधनालाही त्यांनी विरोध केला. जिथे उजेड आहे तिथेच लोक संशोधन करतात, हे योग्य नाही, ज्या क्षेत्रात अजून खुप काम करणे बाकी आहे, तिकडे लोक लक्ष देत नाहीत अशी खंत बोलून दखवली. संशोधनाचा विषय हा केवळ त्या कालखंडातील समस्यांपुरता मर्यादित न ठेवता पुढील कित्येक दशके, शतके उपयुक्त ठरेल असे क्षेत्र निवडले जावे.

त्यांच्या वैयक्तीक संशोधनाची कथाही सांगीतली. पहिले ६ वर्षे त्यांचा संशोधनाला एकाही विद्यापीठाकडून मागणी येउ शकली नाही, अशी आठवण सांगितली.

एकूणच, सध्याच्या publication and commercial अश्या cheap research interest ठेवणाऱ्यांबद्द्ल चीड व्यक्त केली.

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहेआपण वाचत असतो .पण तो केवळ टाईमपास नाही . पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत .तेव्हा आपण घडतही असतो त्यामुळे .असतात वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातूनही शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. आणि मातृभाषा जर मराठीसारखी भरजरी, वैभवशाली आणि धारदार असेल तर मनावर होणारा परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विनामूल्य मिळवतो. कधी घरात पडलेलं. कधी शेजारून. कधी वाचनालयातून. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी पेरावी, रुजवावी, जोपासावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहिही साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

आता आम्हाला वाचकांचं पाठबळ हवंय. ज्यांना पुस्तकं वाचायला आवडतात त्यांचे ई मेल पत्ते पाठवाच. पण जे साक्षर असून, मराठी असून वाचत नाहीत, किंवा 'मराठी' वाचत नाहीत अशांचे मेल पत्ते आवर्जून पाठवा. अशा दहा लोकांपैकी एकाला जरी मराठी वाचनाची आवड लावण्यात आपण यशस्वी झालो तरी ते एक पुढचे पाऊल असणार आहे. म्हणून ही कळकळीची विनंती आहे की आपल्या आजूबाजूच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. या पत्त्यांचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी पुस्तके पाठवण्यासाठी केला जाईल. त्याचबरोबर तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद म्हणून नोंदले जाईल. ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान